MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष सोळावे / अंक १ / जानेवारी २०१५

## संपादकीय

### झेंडा मराठीचा

साहित्य संमेलन जवळ आले की मराठी भाषेची सद्य:परिस्थिती आणि तिच्या उत्कर्षाच्या योजनांची चर्चा सुरू होते. वर्षभर शांत असलेला हा विषय महिना-दोन महिने माध्यमांना खाद्य पुरवण्यापलिकडे फारसा सरकत नाही. या सगळ्या चर्चेतून निष्पन्न काहीच होत नाही. साहित्य संमेलनात आधी घेतलेल्या अनेक निर्णयांचे काय झाले, याचाही आढावा घेतला जात नाही. संमेलनांच्या आजी माजी अध्यक्षांची भाषणे मात्र अनेक नवीन वाद जन्माला घालत असतात.

भाषा हे संपर्काचे साधन आहे. ती जशी बोलली जाते तशीच लिहिलीही जाते. निदान भारताला तरी या लिखित संस्कृतीचा काही हजारो वर्षांचा इतिहास आहे. या कालावधीत काही लाखांनी हस्तलिखिते नष्ट झाली असली तरी ३०-४० लाख देवनागरी आणि इतर भाषांतील हस्तलिखिते आज उपलब्ध आहेत. संस्कृतीचा जिवंतपणाच ती दाखवितात. अध्यात्मापासून विज्ञानापर्यंतच्या संस्कृतीच्या सर्व अंगांवर साहित्य निर्माण होत असते. अशा लिखाणाची विपुलता आणि कसदारपणा यातूनच त्या भाषेचा आणि संस्कृतीचा जिवंतपणा दृष्टमान होत असतो. उत्क्रांतिशास्त्राप्रमाणे, भाषा ही माणसाला मिळालेली एक सर्वांत मोठी देणगी आहे. साहजिकच तिची रचना आणि उच्चारशास्त्र यांचेही एक विज्ञान तयार होते. यातूनच भाषाविज्ञान विकसित होत ते भाषेला प्रमाणभाषेकडे घेऊन जाते. पाश्चात्त देशांमधील ग्रीक, लॅटिन आणि आपल्याकडील संस्कृत ही याचीच उदाहरणे आहेत.

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीज आणि सतराव्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रज, फ्रेंच, डच व्यापारी भारतात येऊ लागले. त्याच वेळी युरोपमध्ये प्रबोधनयुग चालू होते. भाषा, संस्कृती, कला यांच्यावरील धर्माचा पगडा कमी होत ती सगळी क्षेत्रे अधिक सर्जनशील होत होती. त्याच वेळी म्हणजे पंधराव्या शतकात युरोपमध्ये छपाईयंत्राचा शोध लागला (१४५०). या शोधामुळे युरोपच नाही तर जगामध्ये एक मोठी क्रांती घडली. दुर्दैवाने, पंधराव्या शतकातील ही क्रांती महाराष्ट्रात पोहोचायला १९ वे शतक उजाडावे लागले. सोळाव्या शतकात गोव्यामधील पोर्तुगीजांचे (१५५६) आणि सतराव्या शतका गुजरातमधील इंग्रजांचे ? (१६७६) काही प्रयत्न सोडले तर भारतामध्ये ही मुद्रणक्रांती यायला तसा उशीरच झाला. मद्रासमध्ये १७७२ साली तर कलकत्त्यात १७७९ साली छपाई होत होती. स्वात्झ्रा या धर्मप्रसारकाच्या

(पृष्ठ क्र २ वर)


(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

मदतीने सरफोजींनी तंजावरला 'नवविद्याकलानिधी' या नावाने १८०५ साली छापखाना चालू केला. १८०६ साली देवनागरीतून त्यांनी 'बालबोध मुक्तावली' हे पुस्तक छापले. याच वेळी कलकत्त्याजवळील श्रीरामपूर या डच वसाहतीतून कॅरे हे धर्मप्रसारक ख्रिस्ती धर्मप्रसाराची मराठी पुस्तके छापत होते. १८०५ साली 'मराठी भाषेचे व्याकरण' तसेच 'मत्तम कृत शुभवर्तमान', 'मराठीचा शब्दकोश' (१८१०), 'सिंहासनबत्तिशी'(१८१४) 'हितोपदेश' (१८१५) असा मराठी पुस्तके छापण्याचा सपाटा त्यांनी चालू ठेवला.

युरोपियन देशांच्या व्यापाऱ्यांबरोबरच त्यांचे धर्मप्रसारकही भारतात येऊ लागले. कालांतराने या सर्वांनी आपल्या वसाहती भारतात स्थापन केल्या, आणि १८५७ च्या युद्धानंतर इंग्लंडच्या राणीचे साम्राज्यही येथे अधिकृतपणे स्थापन झाले. साहजिकच महसुलापासून सामाजिक, राजकिय, प्रशासकीय रचनाही त्यातून निर्माण होऊ लागल्या. हा इतिहास आपणां सर्वांना ज्ञात आहे, पण या पोर्तुगीज, फ्रेंच किंवा इंग्रज वसाहतवाद्यांनी आपल्या संस्कृती आणि भाषेचे केलेले संशोधन मात्र आपल्याला फारसे माहीती नाही. स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग म्हणून वसाहतवादाकडे खलपुरुष दृष्टिने बघणे सयुक्तिक असले तरी त्यांच्या संशोधक वृत्तीला दूषणे देऊन आपण आपले फार मोठे नुकसान करून घेतले आहे. वसाहतवादाकरता असो वा धर्मप्रसाराकरिता असो, त्यांनी भाषेचा आणि आपल्या संस्कृतीचा केलेला अभ्यास कमी दर्जाचा ठरत नाही. यातील काही संशोधनामध्ये अहंगंड, स्वतःच्या धर्म आणि संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे आलेला दुराग्रह, आणि इतरही काही राजकिय हेतू होते यात शंकाच नाही. मूळ मुद्दा 'संशोधक वृत्तीचा' आहे, आणि हाच त्यांचा चांगला गुण आपण फारसा घेतला नाही. संशोधन म्हटले म्हणजे त्यांच्या साधनांची निर्मिती आली. यातूनच या वसाहतवाद्यांनी आपल्याकडे अनेक ग्रंथालये आणि संग्रहालये उभारली. आजच्या बहुतेक सर्व भारतीय भाषा, तामीळ, तेलुगू, बंगाली, ओरिया यांना प्रमाणभाषेचे स्वरूप देण्याकरता हवी असलेली व्याकरणे या साहेबांनीच लिहिली. याबरोबरच त्यांनी व्याकरणग्रंथ, शब्दकोश आणि ज्ञानकोशांचीही निर्मिती केली. या सगळ्या भाषांची पुस्तके छापायला सुरुवात केली. महाराष्ट्रामध्ये मातृभाषेतून म्हणजे मराठीतून शिक्षण मिळण्याकरता लागणारी साधने म्हणजे पुस्तकेही सुरुवातीला साहेबानेच तयार केली. श्रीनिवास मधुसूदन पिंगे यांनी १९६० साली 'युरोपियनांचा मराठीचा अभ्यास व सेवा' या पुस्तकातून याची अतिशय चांगली माहिति दिली आहे. थोडक्यात आजच्या मराठीच्या परिस्थितीला, विशेषतः स्वातंत्र्योत्तर ६७ वर्षांनंतरही, कोणी जबाबदार असेल तर ते आपणच आहोत.

जागतिकीकरणाचा आजचा वेग बघता, फक्त 'अस्मिता' आणि 'भावनांचे' राजकारण करून भाषा टिकणे शक्य नाही. साहेबाने केलेली प्रमाणभाषाही आपण जातीय द्वेषापोटी भ्रष्ट करण्याचा जणू विडाच उचलला. बोली भाषेच्या श्रेष्ठत्वाकरता आणि पुरोगामित्वाचा टेंभा मिरविण्याकरता बऱ्याच विद्वानांना बोलीभाषेबद्दल प्रचंड उमाळा येऊ लागला. संस्कृतचा दुस्वास चालू झाला. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठी आणि संस्कृतीच्या विकासाच्या नावाने अर्धा डझन संस्था निर्माण झाल्या आणि कोट्यवधी रुपयेही खर्च

(पृष्ठ क्र. ३७ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक ७ / जानेवारी २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | हॅलेन डोंगरातील अप्रतिम अश्मकला | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | काश्मीरची कळी खुलणार का? | प्रा. सुभाष गं. शिंदे | ५ |
| ४) | दिशा वेगवेगळ्या गती-प्रगतीच्या | श्री. मनोहर तळेकर | ९ |
| ५) | नर्मदा परिक्रमा (भाग : १२) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ६) | विकासवेध- : चिनाब नदीवरला लोहमार्ग पूल | श्री. नरेंद्र गोळे | १४ |
| ७) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १७ |
| ८) | प्रकल्प अहवाल | | २३ |
| ९) | ‘अवती भवती’ | ज्योती शिंदे | २६ |
| १०) | आकाश टॅबचा अध्ययन-अध्यापन पद्धतीत वापर : एक अभिनव उपक्रम | डॉ. कमलाकर देसाई | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# हॅलेन डोंगरातील अप्रतिम अश्मकला

*चीनमधील यिंचुआन या शहराजवळील हॅलेन या डोंगरातील अप्रतिम अश्मकलाची माहिती विशद कराणारा लेख - संपादक*

प्राचीन काळातील माणूस दगडावरच चित्रे कोरायचा. या चित्रांचे विषय त्याच्या रोजच्या जीवनाशी संबंधित असल्याने अशी अश्मकला बऱ्याच ठिकाणी गुहेत आढळते. काही ठिकाणी मात्र उघड्यावर असलेल्या दगडावर मानवांनी चित्रे कोरल्याची उदाहरणे आहेत. भारतात भीमबेटका या ठिकाणी अशा प्रकारचे शिल्प पाहायला मिळते. २७ व्या चीन विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने आम्ही यिंचुआनला गेलो. तेथून जवळच अश्मशिल्पांचा खजिना आहे. यिंचुआन शहरापासून साधारणपणे ६० किलोमीटर अंतरावर हॅलेन नावाचा एक डोंगर आहे. हा डोंगर निक्शिया आणि आंतरमंगोलियन प्रांत वेगळे करतो. मंगोलियातील लोक मेंढपाळीचा व्यवसाय करणारे तसेच लढवय्ये होते. त्या मानाने निक्शिया प्रांतातील लोक शेती करणारे आणि शांत स्वभावाचे होते. या डोंगरामुळे त्याचे मंगोलियन लोकांपासून संरक्षण व्हायचे. म्हणून निक्शिया प्रांतातील लोक या डोंगराला बरेच महत्त्व देत असत. आता आक्रमणाचा धोका नाही. तरीही या प्रांतातील लोक या डोंगराला खूप महत्त्व देतात. याचे कारण तेथे असलेली अश्मकला हे होय. डोंगरातील खडकावर प्राचीन काळातील लोकांनी कोरलेली चित्रे तिथे अजूनही शाबूत आहेत. ‘‘यिंचुआनला आलांत आणि ही शिल्पे पाहिली नाहीत तर काहीच पाहिले नाहीय असे म्हणतात. हाच विचार करून आमच्या आयोजकांनी आमची हॅलेन डोंगरावर सहल घडविली. ज्या दिवशी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे मूल्यमापन असते त्या दिवशी मोठ्या मंडळींना प्रदर्शनस्थळी प्रवेश नसतो. नेमका तोच दिवस आयोजकांनी या सहलीसाठी निवडला. त्यामुळे आम्हांला अश्मशिल्पे मन भरून पाहता आली. त्याचाच आढावा या लेखात घेतलेला आहे.



**हॅलेन डोंगराचे दुरून दर्शन**

सकाळची न्याहारी आटोपून आम्ही प्रवासाला सुरूवात केली. साधारणपणे एक तासाच्या प्रवासानंतर आम्ही डोंगराजवळ पोहोचलो. सकाळच्या सूर्याची किरणे डोंगराच्या माथ्यावर पडत असल्याने तो उजळून निघाला होता. त्यामुळे दुरूनच नव्हे तर जवळूनदेखील डोंगराचे दृश्य मनमोहक असेच दिसत होते. डोंगराच्या पायथ्याशी आमची बस थांबली. आमच्या आयोजकांनी प्रवेशाची तिकिटे विकत घेतली आणि आम्ही एका नक्षीकाम केलेल्या सुंदर दारातून आत प्रवेश केला. पुढे एक इमारत दिसत राहते. या इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर जगातील वेगवेगळ्या ठिकाणच्या अश्मशिल्पांचे नमुने ठेवलेले आहेत. ते बघत बघत पायऱ्या चढून आपण वर जातो ते त्या इमारतीच्या प्रवेशद्वारातच. हे नव्याने बांधलेले अश्मशिल्पांचे संग्रहालय आहे. येथे हॅलेन डोंगरातील अश्मशिल्पांची चित्रे आहेतच. त्याचबरोबर जगाच्या वेगवेगळ्या भागात असलेल्या अश्मशिल्पांची चित्रे आहेत. भारतातील भीमबेटका येथे असलेले शिल्प पाहायला मिळते. त्याचबरोबर आफ्रिका, अमेरिका, युरोप, जपान, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशांतील अश्मशिल्पे पाहायला मिळतात. त्यांतील काही छायाचित्रे येथे दिलेली आहेत.



अश्मकलेची छायाचित्रे

संग्रहालयातून आपण बाहेर पडतो तोच विजेवर चालणारी वाहने आपली वाट पाहत असतात. डोंगरात प्रदूषण होऊ नये म्हणून घेतलेली ही काळजी आहे. या वाहनात आपण बसलो की ते आपल्याला डोंगरातील शिल्पांच्या प्रवेशद्वाराजवळ नेऊन सोडते. त्यानंतर आपण डोंगराच्या कडेकडेने फेरफटका मारायचा असतो. जागोजागी तेथे असलेल्या शिल्पांची माहिती देणारे फलक आहेत. या फलकांवरील माहिती वाचून त्यांच्याजवळच पाहिले की आपल्याला शिल्प दिसते. शिल्पांची संख्या शेकड्यांनी आहे. त्यांतील काही आता अस्पष्ट झालेली आहेत. असे जरी असले तरी अनेक शिल्पे अजूनही चांगल्या स्थितीत आहेत. त्यांत प्रामुख्याने समावेश होता तो मानवी चेहऱ्यांचा. त्यानंतर क्रम लागतो तो प्राण्यांचा. यांमध्ये शेळी, हरीण, घोडा या प्राण्यांची अनेक चित्रे आहेत. त्याचबरोबर प्राण्यांची बाणाने शिकार करण्याची अनेक चित्रे आहेत. याखेरीज स्त्री-पुरुष संबंध दाखविणारी अनेक शिल्पे येथे आहेत.



दगडावर कोरलेले चित्र



दगडावर रंगविलेले चित्र

डोंगरातील खडकांकडे पाहिले की ते गाळाचे खडक असावेत असे वाटते. कधी काळी हा भाग समुद्रतळाशी असावा असा अंदाज करता येतो. पृथ्वीवर झालेल्या हालचालीने तो वर आला असतो. अशा खडकात शिल्प काढणे फारच सोपे असते. भारतात बदामी येथे अशाच प्रकारचे खडक आहेत. तेथे अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत. डोंगरातून पाण्याचा एक झरा वाहतो. आजूबाजूला वाळवंटासारखी स्थिती आहे. वाहते पाणी कुठेच नाही. अशा परिस्थितीत डोंगरात असलेला पाण्याचा वाहता झरा आपले कुतूहल जागे करतो. डोंगराच्या वरच्या भागात हिवाळ्यात बर्फ पडतो. तो वितळल्याने जे पाणी तयार होते ते या झऱ्यातून खाली येते. शिल्पाबरोबरच झऱ्याचे पाणी देतो म्हणून हा डोंगर स्थानिक रहिवाशांना फारच प्रिय आहे. आम्हांलादेखील तो खूप आवडला. कधी यिंचुआनला जाण्याची संधी मिळालीच तर या डोंगराला आवर्जून भेट द्यावी.



डोंगरातून वाहणारा झरा

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण - शीळ रोड, काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

# काश्मीरची कळी खुलणार का?

*काश्मीरच्या समस्येचा ऊहापोह करणारा लेख - संपादक*

जम्मू-काश्मीर हे भारताच्या अति उत्तरेकडे वसलेले निसर्गसम्य व हिमालयाच्या कुशीतील अतिशय सुंदर राज्य आहे. काश्मीरच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे 'राजतरंगिणी' हे अतिशय छान पुस्तक मध्ययुगीन काळात कल्हण या लेखकाने लिहिलेले आहे. आपण भारतीय अभिमानाने सांगत असतो की, जगाच्या पाठीवर कुठे स्वर्ग असेल तर तो काश्मीर होय. परंतु आपण भारतीय जाणतो सद्यःस्थितीत काश्मीर नामक स्वर्ग दहशतवादाच्या छायेत वावरत आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचा तत्कालीन नकाशा सध्याच्या नकाशापेक्षा फारच वेगळा होता. तेव्हाचे भौगोलिक चित्र अतिशय निराळे होते. ह्याचे कारण म्हणजे जेव्हा १९४७ साली आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतात दोन प्रकारचे प्रदेश अस्तित्वात आले म्हणजे असा भूभाग की जो १९४७ पूर्वी ब्रिटिशांच्या थेट नियंत्रणाखाली होता व दुसरा म्हणजे ज्यावर संस्थानिकांचे राज्य होते असा भूभाग. ह्या संस्थानिकांचे वा संस्थानांचे परराष्ट्र धोरण, संरक्षण, संवाद व दळण-वळण इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर ब्रिटिशांचा अंकुश होता, परंतु त्यांच्या अंतर्गत कारभाराचे पूर्ण स्वातंत्र्य संस्थानिकांना होते. हे संस्थानिक व त्यांची संस्थानं १९४७ पूर्वी ब्रिटिशांची मांडलिक होती. १८५७ च्या ऐतिहासिक उठावानंतर भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली आणि आधुनिक शिक्षण व त्यातल्या त्यात इंग्रजी शिक्षण घेतलेला तरुणांचा एक नवीन वर्ग भारतात उदयास येऊ लागला. या तरुणांनी ब्रिटिश राज्यकर्ते भारताचे आर्थिक शोषण करत आहेत हे ताडले व त्यातून राष्ट्रीय चळवळीची उभारणी झाली. कालांतराने २० व्या शतकाच्या सुरूवातीपासून भारतीय राष्ट्रीय चळवळीचे रुपांतर स्वातंत्र्यलढ्यात झाले. भारतीयांची अस्मिता पूर्णतः जागृत झाली व त्यांनी ब्रिटिश शासनाकडून थोड्याफार सुधारणांची अपेक्षा सोडून देऊन पूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून ते १९४७ पर्यंत भारतातील वातावरण प्रामुख्याने अशा प्रदेशांमध्ये की जे ब्रिटिशांच्या थेट नियंत्रणाखली होते, ढवळून निघाले व ब्रिटिशांविरुद्धचा लढा जोमाने सुरू होता. या संपूर्ण स्वातंत्र्यलढ्यापासून संस्थानिकांनी आपल्या संस्थानांना व जनतेला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यात सपशेल अपयश आले. भारतातील अनेक संस्थांनांमधील जनता ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यामुळे प्रभावित झाली होती. तसेच या संस्थानांमधील जनतेने ब्रिटिशांविरुद्ध नेतृत्व करणाऱ्या भारतीय नेत्यांना आपलेदेखील मानण्यास सुरुवात केली होती. उदाहरणच द्यायचे झाले तर हैदराबाद संस्थानातील स्वामी रामानंद तीर्थ आदी नेते. लोकमान्य टिळक व इतर नेत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रभावीत झाली होती. याच काळात संस्थानिकांची भूमिका मात्र ब्रिटीश धार्जिणी होती. कारण ब्रिटीशांचे लांगूलचालनचा करून त्यांना आपले हक्क व अधिकार अबाधित ठेवायचे होते.

या सर्व पार्श्वभूमीवर आपणांस १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अगोदर उल्लेखिलेल्याप्रमाणे

---

बाह्यशत्रूपेक्षा बऱ्याच वेळी अंतःशत्रूचीच अधीक भीती असते.

भारतात दोन प्रकारचे प्रदेश अस्तित्वात आले व भारतातील संस्थानांची संख्या शेकडोंपेक्षा जास्त होती. त्यामुळे भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, स्वतंत्र भारत सरकारच्या आधिपत्याखालील भूप्रदेश व पूर्वाश्रमीच्या ब्रिटीशांच्या मांडलिक संस्थानिकांच्या आधिपत्यखालील संस्थाने असे दोन प्रकारचे प्रदेश अस्तित्वात आले.

पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान तर सरदार वल्लभभाई पटेल हे पहिले गृहमंत्री बनले. सरदार वल्लभभाई पटेलांनी भारत सरकारच्या वतीने पुढाकार घेऊन अनेक संस्थानिकांशी चर्चा केली व त्यांना आपले राज्य भारतात विलीन करण्यास राजी केले. परंतु जुनागढ़ हे गुजरातमधील काठियावाड प्रांतातील छोटेसे संस्थान होते व त्यावर मुस्लीम नवाबाचे राज्य होते. या संस्थानातील बहुतांश जनतेला भारतात विलिन व्हायचे होते. मात्र नवाब यास उत्सुक नव्हता शेवटी नवाबास पाकिस्तानात पळ काढावा लागला व जुनागढ़ भारतात सामील झाले.

हैदराबाद हे दक्षिण भारतातील मोठे संस्थान होते. हैदराबादच्या मुस्लीम राजांना 'निझाम' या किताबाने संबोधले जात होते. हैदराबादच्या निझामालादेखील भारतात विलीन होण्यात स्वारस्य नव्हते त्यामुळे भारत सरकारला काही प्रमाणात पोलिसी कारवाई करून हैदराबाद भारतात विलीन करुन घ्यावे लागले.

जम्मू व काश्मीरच्या बाबतीत तत्कालीन राजा हरिसिंग याने सुरुवातीस आपली भूमिका घेण्यास उशीर केला. त्याचा फायदा उठवून पाकिस्तानने काश्मीरच्या दुर्गम भागातील मुस्लीम पठाणी टोळ्यांना पाकिस्तानच्या लष्कराच्या मदतीने काश्मीरभर सैनिकी कारवाया व घातपात करण्यास उद्युक्त केले. त्यामुळे काश्मीरच्या हरिसिंग या राजाने भारत सरकारकडे या पठाणी टोळ्यांच्या आक्रमणाविरुद्ध व घातपाती कारवायांविरुद्ध मदत मागितली. या पार्श्वभूमीवर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारत सरकार व राजा हरिसिंग यांच्यात काश्मीरच्या भारतात विलीनीकरणाबाबतच्या करारावर (इंग्रजीत ज्याला इंस्टमेंट ऑफ ॲक्सेशन Instrument of Accesion असे म्हटले जाते) सह्या झाल्या व काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाले. मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता कारण पाकिस्तानने जवळजवळ ३५% काश्मीर, ज्यात बाल्टिस्तान व गिलगिटचा समावेश होता, गिळंकृत केला होता. त्यानंतर हा तंटा दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता राखण्यासाठी निर्माण झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेत नेण्यात आला आणि भारत आणि पाकिस्तानच्या दरम्यान काश्मीर क्षेत्रात 'नियंत्रण रेषा'(Line of Control) ही नवीन सीमा निश्चित करण्यात आली. सध्या या नियंत्रण रेषेच्या पूर्वेकडील जवळजवळ ४५% भाग हा भारताच्या ताब्यात असून त्यात जम्मू, काश्मीरचे खोरे व लड़ाखचा समावेश आहे. या 'नियंत्रण रेषेच्या' पलीकडील काही भाग चीनच्या ताब्यात आहे. चीनने हा भाग १९६२ च्या भारत व चीनमधील युद्धानंतर गिळंकृत केला आहे. ही भारतासाठी फार धोकादायक घटना आहे. कारण या प्रदेशातून चीनने पाकव्याप्त काश्मीरमध्ये जाणारा आणि त्याद्वारे पाकिस्तान व चीनला जोडणारा महामार्ग बांधला आहे आणि पाक व्याप्त काश्मिरपासून पुढे पाकिस्तानातील अति दक्षिणेकडील अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेल्या कराची या शहराला जोडणारा लोहमार्ग बांधण्याचे देखील चीनचे मनसुबे आहेत. चीनची हि सर्व कृत्ये भारताच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

आपण काश्मीरचे भौगोलिक स्थान पाहिले तर लक्षात येते की हा प्रदेश १९९१ पर्यंत पाकिस्तान, अफगाणिस्तान, भारत, चीन व तत्कालीन सोव्हिएत संघ या देशांच्या सीमांवर वसलेला भूभाग होता.

१९९१ साली सोव्हिएत संघाचे विघटन झाल्यानंतर

---

सोव्हिएत संघाऐवजी त्यापासून विघटित झालेल्या ताजिकिस्तान ह्या राष्ट्राच्या सीमा काश्मीरला लागलेल्या आहेत. परंतू एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे की, काश्मीरचे भौगोलिक स्थान असे आहे की, हा प्रदेश ज्याच्या ताब्यात राहील त्या देशाला वर नमूद केलेल्या विविध देशांवर लक्ष ठेवणे सहज शक्य होईल. काश्मीरच्या या भौगोलिक स्थानाला इंग्रजीत स्ट्रॅटेजिकली लोकेटेड(Strategically located) असे म्हटले जाते.

काश्मीरच्या या भौगोलिकदृष्टचा अतिशय संवेदनशील व महत्त्वाच्या स्थानामुळे पाकिस्तान व चीन या राष्ट्रांना त्याचे नियंत्रण आपल्याकडे असावे वा काश्मीर आपल्या ताब्यात असावा असे वाटते. त्यातूनच पाकिस्तान व चीनमधे भारताविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग म्हणून त्यांच्या ताब्यात असलेल्या काश्मीरच्या भूभागात एकमेकांना सहकार्य करून रस्ते वगैरे बांधण्याचे काम चालू आहे. अर्थातच या सर्व सुविधांचा भविष्यात भारतावर आक्रमण करण्यासाठी व दबाव आणण्यासाठी उपयोग करणे हा एक उद्देश आहे यात काहीच शंका नाही. पाकिस्तान व चीनचे हे उपद्व्याप शत्रूचा शत्रू तो अपाला मित्र या नात्याने चालू आहेत. कारण आपण जाणतोच की, भारत व पाकिस्तानात १९६५ व १९७१ साली दोन युद्धे झाली व तत्पूर्वी १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले होते. या युद्धांनंतर भारत सरकारने आपल्या परीने अनेक प्रामाणिक प्रयत्न करूनदेखील पाकिस्तान व चीनच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे आपले उभय देशांशी संबंध आजतागायत सुधारू शकले नाहीत.

काश्मीरचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रदेशात अतिशय मोठ्या प्रमाणात गोड पाण्याचे (पिण्याच्या पाण्याचे) स्रोत आहेत कारण हा पूर्ण प्रदेश हिमालय पर्वतरांगांत व त्यांच्या कुशीत वसलेला आहे. तसेच या प्रदेशात मोठ्या प्रमाणात खनिज पदार्थ आहेत. काश्मीरच्या या साधनसंपत्तीवर देखील पाकिस्तान व चीनचा डोळा आहे त्यामुळे ते सतत भारतविरोधी कारवाया करताना आढळतात व प्रामुख्याने काश्मिरातील दहशतवादी कारवायांना खतपणी घालताना दिसतात.१९८० च्या दशकात पाकिस्तानचे तत्कालीन लष्करशहा जनरल झिया-उल-हक यांनी तर भारताविरुद्ध छपे युद्ध करण्याचा कानमंत्रच पाकिस्तानी सैन्याला दिलेला आढळतो. याच छूप्या युद्धाचा भाग म्हणजे 'ऑपरेशन टोपॅक' हे होय. साधारणतः १९८० च्या दशकानंतर काश्मीरमधील दहशतवादाची समस्या जास्त प्रमाणात चिघळलेली आढळते. गेल्या पंचवीस-एक वर्षांत तर काश्मीरमध्ये दहशतवादाने थैमान घातले आहे.

१९८० पूर्वीपर्यंत काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक जात असत. त्यामुळे काश्मीरमध्ये पर्यटन हा मोठा व्यवसाय बनला होता. अनेक लोकांना आणि प्रामुख्याने स्थानिक तरुणांना नोकऱ्या व उद्योगधंदे उपलब्ध होते. या काळात हॉटेल व्यवसाय व काश्मिरी शाली आदी बनवणारे हस्तोद्योग ही तेजीत चालत. काश्मिरमध्ये जाणारे बहुतांशी पर्यटक परतताना काश्मीरच्या कलावंतांनी बनवलेल्या शाली व इतर कलाकुसरीच्या वस्तू विकत घेऊन परत येत असत. त्यामुळे काश्मीरची आर्थिक स्थिती चांगली होती. पर्यटनासोबतच १९६० व १९७० च्या दशकांत भारतीय चित्रपटांचे प्रामुख्याने हिंदी चित्रपटांचे चित्रीकरण मोठ्या प्रमाणात होते असत. त्यामुळेदेखील काश्मीरची आर्थिक स्थिती चांगली होती व तरुणांना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत्या.

वर नमूद केल्याप्रमाणे १९८५ नंतर मात्र सातत्याने काश्मीरमधील स्थिती व एकूणच दहशतवादाची समस्या बिकट होत त्यांचे चित्र आढळते. तरुण वर्ग वैफल्यग्रस्त होत चाललेला आढळतो. त्यातच पाकिस्तानचे दहशतवादाला खतपाणी घालण्याचे व अनेक प्रसंगी पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्रशिक्षित केलेले दहशतवादी भारतातील काश्मीरमध्ये पाठवणे या कारवायांमुळे स्थिती

दिवसेंदिवस नाजूक बनत चालली आहे.

१९९९ साली तर पाकिस्तानने भारतावर अघोषित असे तिसरे युद्ध लादले. या युद्धास 'कारगिल युद्ध' असे संबोधले जाते. पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने पाकिस्तानने लादलेल्या या युद्धाला सडेतोड उत्तर दिले व पाकिस्तानला पळता भुई सपाट केली.

गेल्या काही वर्षांत काश्मीरमधील परिस्थितीत थोड्याफार प्रमाणात बदल व सुधारणा होत चालल्यात असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्याचे भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी तर त्यांच्या झंझावाती कार्यशैलीमुळे संपूर्ण भारतात चैतन्याचे वातावरण निर्माण केले आहे. या चैतन्यलहरी काश्मीरपर्यंत पोचल्यात असे म्हणावे लागेल. कारण तेथील सुधारत चाललेली परिस्थिती ही त्याचे द्योतक आहे.

काश्मीरमध्ये २०१४ नैसर्गिक प्रलय आल्यानंतर भारत सरकारने व लष्कराने जे मदतकार्य केले व पीडीतांना तातडीने मदत पोहोचविण्यात आली त्यामुळे काश्मीरच्या जनतेत आत्मविश्वास जागृत झालेला दिसतो. या आत्मविश्वासाचा फायदा घेऊन काश्मीर मधील दहशतवाद नामक भस्मासुराचा कायमचा अंत करता येईल काय याची चाचपणी करून योग्य ती पावले उचलणे ही काळाची गरज आहे.

काश्मीरसंबंधीचा अजून एक कळीचा मुद्दा म्हणजे भारतीय राज्यघटनेतील कलम ३७० हा होय. या कलमामुळे काश्मीरला विशेष दर्जा प्राप्त झालेला असून त्याला भारत या देशाप्रमाणे देशाचाच दर्जा (State within State) असल्याचे चित्र दिसते. घटनेचे कलम ३७० तर चर्चेचा एक वेगळा मुद्दाच ठरूशकतो. या कलमाचदेखील काश्मीर मधील जनमानसाला भारतापासून दूर नेण्यात थोडाफार हातभार आहे यात वादच नाही. सध्या भारतात मोदी सरकार स्थापन झाल्यापासून ३७० कलमावर संपूर्ण देशभर चर्चा सुरू आहे. अनेक राष्ट्रवादी विचार सरणीचे लोक हे कलम रद्द करावे या मताचे आहेत.

काश्मीरमधील दहशतवादाची समस्या सुटावी व काश्मीरमध्ये पुन्हा 'स्वर्ग' अवतरावा असे वाटत असेल तर काश्मीरची समस्या व घटनेचे कलम ३७० यांवर संपूर्ण देशभर अनेक कार्यक्रम, चर्चासत्रे, वादविवाद इत्यादी होणे आवश्यक आहे. जेणेकरून भारतीयांना व विशेषतः तरुणांना काश्मीरची ओळख खऱ्या अर्थाने होईल. अनेक सेवाभावी संस्थांनी व भारतातील अनेक प्रांतांतील लोकांनी काशमरला सतत भेट देणेदेखील आवश्यक आहे काश्मीरातील तरुणांना व विद्यार्थ्यांना भारतातील इतर प्रांतांच्या सफरी घडवून आणावयाला हव्यात. त्यामुळे खऱ्या अर्थाने काश्मीरची नाळ भारताशी घट्ट जोडली जाईल.अशा राष्ट्रीय जबाबदारीचे भान म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. (सौ.) शकुंतला अ. सिंह यांनी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून महाविद्यालयात काश्मीरविषयी राष्ट्रीय चर्चासत्रे, व्याख्याने इत्यादींचे आयोजन करण्यास सुरुवात केली आहे. सदर कार्यक्रमांच्या आयोजनात श्री. अरुण करमरकर, श्री. धनंजय देवधर व जम्मू काश्मीर अध्ययन संस्था, ठाणे यांचे महाविद्यालयास नेहमीच सहकार्य लाभते. ह्या वर्षी दिनांक ५ डिसेंबर २०१४ रोजी अशाच एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते व त्याचा विषय होता -'भारतीय राज्यघटनेचे कलम ३७०.' काश्मीरची समस्या लवकर सुटून तेथील स्थिती पूर्ववत व्हावी हिच सर्वांशी इच्छा आहे ती लवकरच खरी ठरो हि अपेक्षा!

(पृष्ठ क्र. २२ वर)

# दिशा वेगवेगळ्या गती-प्रगतीच्या

*प्रगतीसाठी दिशा मार्गदर्शनाची आवश्यकता या लेखात विशद केली आहे - संपादक*

माझे एक ज्येष्ठ स्नेही आहेत. त्यांचे पालुपद असते ''माणूस कसाही असला तरी त्याच्या वागण्या, विचाराला लेव्हल म्हणजे दर्जा, उंची हवी.''

माणसालाच काय पण जीवनातल्या प्रत्येक वस्तूस, कार्यक्षेत्रास हा दर्जा असायलाच हवा. ''कशाकरीता?''''सुखप्राप्तीसाठी, आनंदासाठी''.

आमचे हे लेव्हल-स्नेही आग्रह धरता. थोडं गा, पण गोड गा. मोजक लिहा, पण नेटकं, मनास भिडणारं लिहा. ते बायकोस सांगतात, एकच पदार्थ भांड फोडून खावा असा चवदार हवा.

पंचेंद्रिये संतुष्ट होतील अशी तुमची कृती हवी.

पण असेल हरी तर देईल खाटल्यावरी अशी सहज सुखप्राप्ती होत नसते. त्याचा शोध घ्यावा लागतो. शिवाय प्रत्येकाच्या सुखाच्या व्याख्या, कल्पना वेगवेगळ्या असतात.

हा शोध घेण्यासाठी, दिशा-मार्गदर्शन करण्यासाठी गुरूची आवश्यकता आलीच. गुरुमाता, गुरुपिता, गुरुबंधू, साधुसंत, शैक्षणिक संस्था कोणीही असू शकतो. दिशा दाखविणे हे त्याचे मुख्य कार्य असते.

प्रगतीची दिशा ! गुरू ह्या पथावरून चाललेला असतो. अनुभवाचे भांडार त्याच्याकडे असते. सुरूवातीस बारा आणे त्याचे चेल्यास मार्गदर्शन व चार आणे चे ल्याचे आणि त्यानंतर त्या ज्ञानसमृद्धीवर एखाद्या प्रॉजेक्टवर शिष्याचा ७५ टक्के हिस्सा व गुरूचा फक्त आशीर्वादाचा २५ टक्के हात असावा. यातून प्रगतीची पुढील दिशा, मार्ग शोधण्यात शिष्यास आत्मविश्वास प्राप्त होतो. त्याच्या दर्जा (लेव्हल) च्या कल्पनाच बदलतात. आपण गमतीत म्हणू या, त्याची दर्जाची पातळी (लेव्हल) च उंचावते. उदा. ग्रामोफोनचे एके काळी उत्तम मानलेले यंत्र मॉडेल आजच्या उत्तम आवाज तंत्रामुळे (Sound Technology) बेंगरूळी (प्राथमिक) वाटते. कारण सुखाचं शिखर ते हेच असा एकाच ठिकाणी मुक्काम न करता माणूस प्रगतीच्या दिशेने उच्च स्थानी जातो. प्रगतीची दिशा ही नेहमी ऊर्ध्वच असते. भूमीपातळीवरील सौंदर्य नव्याने न्याहाळता येते. त्याच वेळी अंतराळ संशोधनासाठी निळ्या नभाचा वेध घेण्याची जाणीव होते.

हा वरचा दर्जा गाठण्याच्या ओढीमुळेच शास्त्रज्ञ एखादाच शोध लावून थांबत नाहीत. त्यात सुधारणेचा मागोवा घेत असतात. उदाहरणार्थ प्रचंड खोलीभर पसारा मांडलेला पहिला संगणक - आजचे त्याचे कितीतरी पट कार्यक्षम रुपेड आयपॅड किंवा आयफोन, व्हॉटस्‌ॲप केवळ मुठीचा आकार, पण अवघ्या विश्वाचे ज्ञान आपण खिशात ठेवून मिरवीत असतो. आधी दाखवून दिलेल्या दिशेने म्हणजे मार्गदर्शक तत्त्वावर पुढली पीढी चालली म्हणून हे घडले.

अश्मयुगानंतर माणूस पद्धतशीर शेती करू लागला त्या वेळी त्यास लागलेल्या साध्या चाकाचा शोध हा क्रांतिकारक मानला जातो कारण त्याने प्रगतीच्या दिशेस वेग मिळाला. दळण वळण वाढल्यामुळे अर्थशास्त्रास गती आली.त्याच्या ऐहिक सुखाच्या कल्पनाच आमूलाग्र

बदलल्या. पूर्वीच्या संथ आयुष्यात रमणारा माणूस, आज त्यास सारे गतिमान हवे. दर तासास ६०० मैल जेट स्पीड जुने झाले. त्यास आता हजार मैल वेगाने उडणारे सुपरसॉनिक विमान हवे. फॅक्स संदेश पाठवायला पाच मिनिटे लागतात. नको. संगणक इ-मेल पाच सेकंदाज पाठवितो. 'तो' आणि 'ती' ची मधुमीलनासाठी अनुरुप जोडी हेच सहस्रभुजा संगणक महाराज मध्यस्थ म्हणून ठरवितात. रोमँटिक दिशेने जाणारा हा शोध.

सध्या टू सेकंडस् मॅगी जमाना आहे. कुणी म्हणेल, माणसाची ही वाघ मागे लागल्यासारखी घाई आणि हाव आहे न संपणारी. परंतु प्रगती हवी तर हाव असायलाच हवी. ईर्ष्या हवी.

एखादा परिणाम (रिझल्ट) वा उत्पादन मिळविण्यासाठी माणूस श्रमशक्ती, वेळ, पैसा, उत्पादन साधनांची बचत करतो तो अशा नव्या दिशा त्याने शोधल्यामुळे देवाने दिलेल्या बुद्धीचा हा गौरव आहे.

संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, उद्योजकांना वैयक्तिक कीर्ती मिळते, धनलाभ होतो, परंतु मानव जातीच्या कल्याण दिशेकडे जाणारे त्यांचे हे समाजोपयोगी शोध, कार्यकर्तृत्व असते. उदा. वीजनिर्मितीचा शोध आमच्या रात्री उजळून टाकतो. महारोग, क्षयरोग, देवी, प्लेग अशा असाध्य रोगातून माणूस औषधशास्त्र प्रगतीमुळे मुक्त झाला. विमान शोधामुळे प्रवास वेळ वाचला इ. इ.

१७ व्या, १८ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे नव्या वाटा, नव्या दिशा सापडल्या - शेती उद्योग, व्यापार क्षेत्रे यांच्यात संवाद निर्माण झाला. सरंजामशाहीत चाचपडणाऱ्या समाजाचे प्रबोधन झाले. धर्मसत्तेचा प्रभाव कमी होऊन शास्त्र, कलाशिक्षण पुढे आले. त्यामुळे वाफेचे इंजिन, धातू, खनिज तेल, रसायन शास्त्र, अणूरेणू विज्ञान, टेलिफोन, तारायंत्रे, मुद्रणकला असे असंख्य शोध लागले. त्याचा दैनंदिन जीवनात वापर करण्याचे तंत्र विकसित झाले. त्यासाठी शाळा, महाविद्यालये निघाली पुढील पिढीस हे ज्ञान पसायदान झाले व पुढेही अर्थातच होत राहणार.

ठाण्याातील विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय कै. वा. ना. बेडेकर यांचा कृती शीलतेवर एवढा भर होता की त्याच्या मंडळाच्या आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालयातील गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना ते फक्त ३-४ मिनिटेच अध्यक्षीय भाषण करायचे ''वा, अभिनंदन! छान आहे तुमचा हा पराक्रम, उपक्रम, पण हे यश हा आता इतिहास झाला. इथे तो आठवत थांबायचे नाही. आता उद्या पुढे काय करता येईल त्याचा विचार करायचा.

काम करायच म्हणूनच विद्या प्रसारक मंडळाचा ठाण्यात कला, शास्त्र, व्यापार, व्यवस्थापन, तंत्रविद्यान, अभियांत्रिकी, कायदा अशा ज्ञानशखांचा वृक्ष कसा डौलाने उभा आहे हे माझया 'लेव्हल' स्नेह्यांना एकदा सांगावेसे वाटले. ते आनंदून उद्गारले ''प्रगतीच्या दिशेला लांबी आहे. अमाप, तिला पूर्णविराम नाही.''

**लेखक : मनोहर तळेकर**

(१९७०-१९७४ या काळात व्ही पी एम् च्या कलाशाखेचे विद्यार्थी)
(१९९१-१९९२ ''व्ही पी एम् पॉलिटेक्निक व मंडळाच्या कार्यालयात ऑफिस सुपरिटेंडेंट होते)

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

स्वतःला पुर्ण ज्ञानी समजणाऱ्याचा विकास खुंटला.

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १२**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ३८ वा. छिडछडिया - नवग्राम २० km सकाळी ७.१५ ते ५.१५ संध्या. मुक्काम प्राथमिक शाळा**

डांबरी सडकेने नर्मदा मुख्य कालव्यापर्यंत गेल्यानंतर उजवीकडून कच्या, परंतु रुंद रस्त्याने कालव्याला समांतर चाल होती. कालव्याच्या दोन्ही बाजूनी असा रस्ता काढला आहे. पलीकडे जाणारे पूलही आहेत. एक पूल रेल्वेलाईनचा आहे. कालव्याचे पात्र चांगलेच रुंद आहे हे SPAN 9 x 18.0 M या उल्लेखावरून समजते. विशेष म्हणजे कालव्याला आडवी ओलांडणारी (मेण) नदी पाहिली. तिला कालव्याखालून पूर्ण पात्ररुंदीची वाट दिली आहे. याचा अर्थ नदीपात्रावर पूर्ण काँक्रीट स्लॅब टाकून त्यावरून नर्मदा कालवा नेला आहे. अशा सर्व नद्यांसाठी हीच पद्धत आहे असे कळले, म्हणजे वाहने, रेल्वे यांसाठी कालव्यावरून पूल तर नद्यांसाठी कालव्याखालून भुयार! पाणी स्वच्छ निर्मळ आणि हा कालवा उत्तरवाहिनी दिसला. कालव्याशेजारच्या दोन-एक तासांच्या वाटचालीत उजव्या बाजूला बाभळीचे वन दिसले जवळपास सर्व रस्ताभर होते. वन म्हणायचे कारण बाभळी उच उंच होत्या. एकमेकांपासून ५-५, १०-१० फुटांवर असल्यामुळे आरपार दिसत होते आणि पूर्ण छाया आतील मैदानसदृश भागावर होती. या रस्त्याला वर्दळ नव्हती, गाव नव्हते. उगाच एक दोन मोटारसायकली, एखाद दोन सायकली, एखादे वाहन यापलीकडे नाही!



दोन पुलांनंतर चौकडी (नाका-चौरस्ता) लागली. दुपारचे १२ झाले होते. आम्ही तिथल्या गाडीवर काही खाद्यपदार्थ घेत असताना, एका व्यक्तीने अगोदरच पैसे दिले व आमची चौकशी केली. आम्ही कालव्यात स्नानाची व्यवस्था पाहत होतो कारण तिथून कालव्याची आणि आमची फारकत होत होती. भोजनाची व्यवस्था कुठे होऊ शकेल का?यावर ते गृहस्थ म्हणाले, 'माझ्या घरी या, भरपूर पाणी आहे, स्नान करा व भोजनही मी देतो.



'रामदासभाई' असे त्या सद्गृहस्थाचे नाव हातपंप अंगणात होता. तत्परतेने ३ खाटा टाकून त्यावर बिछायती घालून आमच्या विश्रांतीची सोयही केली. स्नान, भोजन छान आटोपले. दरम्यान रामदासभाई आपल्या कामाला निघून गेले. मुळात ते बाहेरच जात होते, पण आम्ही

त्रासाशिवाय विद्या मिळणे अशक्य आहे. नव्हे, त्रास कसा सहन करायचा हे शिकणे हीच विद्या!

भेटल्यावर पुन्हा घरी आले होते. आज राहा, उद्या जा, पुढल्या वेळीसुद्धा इथेच या असे सांगायला त्यांचा मुलगा विकास सांगायला विसरला नाही.

आमचा गावा चांगला आहे. इथे व्यसनी कुणी नाही असो रामदासभाई बोलले होते, आमच्याबरोबर मुलाने श्लोक म्हटले तेव्हा कळले, गाव स्वाध्यायी आहे!

बरेच दिवस न दिसलेले साग पुन्हा दिसायला लागले. पळस मात्र नाहीच नाही. रस्त्याला पूर्ण सावली होती, थंडावा होता, त्रास झाला नाही कारण काश्मीरमध्ये बर्फवृष्टी सुरू आहे (श्रीनगर 2°) इथेही थंडी वाढली आहे.

संध्या. ५ । वाजता नवग्राममध्ये प्रवेश करता करता शाळेतून सुटलेली मुले दिसली. दूर शाळाही दिसली. त्या बाजूने एक मोटरसायकल आली, ती शिक्षकांची असावी असा होरा बांधून मी त्यांना थांबविले व मुक्कामासठी विचारले, ते तत्काळ हो म्हणाले. परंतु ते घरी चालले होते म्हणून त्यांना विनंतिपूर्वक मागे फिरविले, त्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि एक शिक्षक जोसेफ (निघत) होते.

शाळेने ओसरीवरचा एक बल्ब सुरूकरून दिला. समोर नळाच्या भरपूर तोट्या असलेली पाण्याची टाकी आहे. ही प्राथमिक शाळा अतिशय छान, स्वच्छ, सुबक अशी आहे.

शेजारच्या घरातील बाईकडून (सुशीलाबेन) झाडू आणला. शाळेत त्यांनी सुंदर चहाहि आणून दिला व रात्री रोटी व भाजी माझ्यासाठी कारण इतर दोघांना जेवायचे नाही.



**नवग्राम - कानाबेडा**

सुशीलाबेन या सेवाभावी महिलेने काल रात्री छान मक्याची भाकरी, जी मी ३/४ घेतली व तूर व घेवडा दाणे यांची सुंदर आणि भरपूर भाजी मला भोजनात दिली. काल संध्याकाळी चहा आणि हे जेवण तिने इथे शाळेत आणून दिले हे विशेष.

शाळेच्या ओट्यावर थंडी अधिक, बयेकडून दोन कांबळी मिळाली. माझी SL बॅग खास थंडीसाठी, त्यामुळे मला इतर काही लागत नाही, फक्त सतरंजी आणि त्याखाली (कटपोर येथे मिळालेली) कंठाने ! आहेत म्हणून!

सकाळी बेनकडे कोरा चहा पिऊन ७ वाजता शाळा सोडली. सडकेऐवजी शेतरस्त्याने तासभर चालल्यावर बोरियाद हे मोठे गाव आले. तिथे चहा, आवश्यक ते खाद्य पदार्थ चणे, खारे शेंगदाणे, चिकी घेऊन पुढे निघालो. बुरियाद हे गांव मोठे असावे कारण बाजारात दुकाने टपऱ्यांसारखी नव्हती तर मोठी व व्यवस्थित होती.

पुढे गेल्यावर नसगाव (गरुडेश्वर) बांका, सकतला (MA) जाणारा डोंगरी सडक लागली. कालपर्यंत न पाहिलेली पळसाची काही झाडे दिसली. मोठे वृक्ष नव्हते, बालतरूहोते!

सबजा, सबजा म्हणून जी वनस्पती मी पाहत होतो, ती सबजा नसून इतर कोणतीतरी सुगंधी वनस्पती होती वाढणारी, आता जवळपास वाळलेली, तुरे/मंजिऱ्या पूर्ण वाळलेल्या, काही पाने खाली मात्र हिरवी आणि गंधित. याच सारख्या आणि दोन एक वनस्पतीहि अशाच सुगंधी पानांच्या अनुभवास आल्या. हे ज्ञान मला जयेन्द्रसिंग या व्यक्तीले दिले. गावातही त्यांचे घर आहे पण परिक्रमावासीयांची सेवा करण्यासाठी त्यांनी हम रस्त्याच्या कडेला घर बांधले.

बारा वाजता बाका गाव आले. भोजन, स्नान याची चौकशी केल्यावर कळले की फतेसिंग दरबार येथे तयार

भोजन मिळले. रस्ता सोडून आम्ही वळलो आणि बाजूच्या मंदिरापाशी असलेली एक स्त्री, जी आमच्यासाठी नर्मदामाता होती, तिने थेट आम्हांला तिथेच नेऊन सोडले.

पुष्पदन्त मंदिराजवळील धर्मशाळेत आम्ही रात्री खिचडी खाली होती, तोहि फत्तेसिंग दरबार होता परंतु इथे मात्र फत्तेसिंग दरबार हे कुटुंब प्रमुखाचे नांव होते, जे आज ह्यात नाहीत २००६ साली शांत झाले. त्यांचे बंधू अमरसिंग, ज्यांचा एक पाय गुडघ्यापासून दोन-एक वर्षांपूर्वी कापावा लागला, त्यांनी प्रेमाने स्वागत केले. नातू इतका संस्कारी आहे की (वय ४वर्षे, ध्रुवराजसिंग) निरांजन ठेवलेली आरती घेऊन आला. सर्वांना प्रसादही दिला.

या कुटुंबाची ही ३ री किंवा ४ थी पिढी आहे व जी सेवाव्रत आहे.

अंगणात हातपंपावर स्नान, कपडे केले, नंतर डायरी लेखन केले व नंतर सुग्रास, गरम भोजनाचा आस्वाद घेतला. आजीबाई स्वतः अंगणात चुलीपाशी गरम गरम पोळ्या करीत होत्या व आमच्यापर्यंत पोहोचवीत होत्या. टमाटा, बटाटा, वांगी रस्सा, खिचडी.

नर्मदामातेवरील ह्यांचे अकृत्रिम प्रेम आणि मैय्याचे आमच्यावरील प्रेम याचा संगम म्हणजे आजचे आदरातिथ्य!

निरोप घेतला तेव्हा धुतलेले कपडे वाळून सॅकमध्ये गेले होते. रस्त्याला पुढे २/३ कि. मी. अंतरावर गावे लागतात. मध्यप्रदेश जवळ येऊ लागला तसतसे 'नर्मदे हर' चे गुंजन पुन्हा प्रभावशाली होऊ लागले आहे. नुकत्याच बोलायला लागलेल्या बालकापासून ते युवती / युवकांपर्यंत, नव्हे सर्व आबाल वृद्धांपर्यंत आवर्जून 'नर्मदे हर' ने स्वागत होते. आज शाळा सुटली तेव्हा आम्ही तिथून जात होतो तर उपस्थित असलेल्या सर्व ५०/१०० मुलींनी 'नर्मदे हर' च्या गुंजनाने परिसर भारून टाकला. प्रत्येक मुलीचा वेगळा 'नर्मदे हर' आणि प्रत्येक 'नर्मदे हर' ला आमचा प्रतिसाद मिळेपर्यंत हा पुकारा सुरूच राहतो.

पूर्वी वाजत गाजत लग्नाची वरात निघे तेव्हा बँडच्या आवाजाच्या अनुरोधाने रस्त्यावरी, आळीमधील घरातील माणसे दारे उघडून फटाफट बाहेर येत त्याची आठवण झाली.

इकडल्या 'नर्मदे हर' चा आवाज पुढे पोहोचला की तिथली मुले, आम्ही समोर येण्यापूर्वीच तयारीत राहत आणि आम्ही रस्त्याने त्यांच्यासमोर आलो की 'नर्मदे हर' 'नर्मदे हर' 'नर्मदे हर' असा पुकारा पुढे पुढे सरकत राही.

शाळा सुटली तेव्हा ४॥५ वाजले असावेत, शाळेत मुक्काम करावा म्हणून मी थांबला होतो परंतु उघड्या ओसरीवरील मुक्काम नको, थंडी आहे, म्हणून २ किमी पुढे असलेल्या कानाबेडा या गावात 'श्री जयस्वाल' यांच्याकडे थांबलो तेव्हा ५॥ झाले होते.




रामसमुच श्री जयस्वाल यांचे दुकान आहे. त्यांच्या पत्नी कलावतीबेन मुले होण्यापूर्वीपासून नर्मदा परिक्रमावासीयांना सेवा देत आहेत. आमच्याशी बोलला तो मुलगा ३७ वर्षांचा आहे! १९५३ सालापासून ही परंपरा आहे.

उत्तम भोजन, तेही त्यांच्या जेवणापूर्वी. झोपायची सोय बांधत असलेल्या वरच्या मजल्यावर. एरवी अशा खोलीत झोपलो नसतो कारण खिडक्या फळी/कपडा

(पृष्ठ क्र. २२ वर)

# विकासवेध- : चिनाब नदीवरला लोहमार्ग पूल

*चिनाब नदीवरील लोहमार्ग पूलाची माहिती या लेखात दिली आहे - संपादक*



वरील प्रकाशचित्रात, भारतीय लोहमार्ग प्रशासनाद्वारे अंगीकृत, २०१६ साली पूर्ण होत असलेल्या प्रकल्पामधील, प्रस्तावित चिनाब पुलाचे, कलाकाराच्या कल्पनेतील आरेखन दर्शवलेले आहे. पुलावरील रस्त्याच्या, पाण्यापासूनच्या उंचीसंदर्भात, हा पूल जगातील सर्वात उंच (१) लोहमार्ग पूल ठरणार आहे.

भारतात हे एक जागतिक नवलविशेष आकारास येत आहे. काश्मीरमध्ये घातल्या जात असलेल्या नवीन लोहमार्गावर, चिनाब नदीवरला लोहमार्ग-पूल तयार होत आहे. हा पूल असणार आहे जगातला सर्वांत उंच[१] पूल. हल्लीचा जगातील लोहमार्गांवरील सर्वांत उंच१ पूल फ्रान्समधील टेम नदीवर आहे. त्याची उंची ३४३ मीटर आहे. ह्याची उंची ३५९ मीटर इतकी असणार आहे. तुलनेकरता इथे हे सांगायला हवे की जगद् विख्यात आयफेल टॉवरची उंची ३२४ मीटर आहे, तर नवी दिल्लीमधील कुतुबमिनारची उंची ७२ मीटर आहे.

जम्मूआणि काश्मीर राज्यातील, रिआसी जिल्ह्यातील, कुरी गावातून बक्कल गावाकडे सुरू होणारा त्या पर्वतीय मार्गावरचा चढाचा प्रवास हा अत्यंत त्रासदायक, पाठीचा कणाच मोडणारा असतो. मात्र, आजूबाजूच्या नैसर्गिक रौद्र सौंदर्यामुळे तो काहीसा सुसह्य होतो. चिनाब नदीही बाजूला वरून खाली वाट उतरत असतेच. रस्ता वर चढत जातो तसतसे दोन्ही किनाऱ्यांवरील उंचच उंच कड्यांतून खोलवर वाहणाऱ्या शक्तिशाली चिनाब नदीच्या छोट्याशा दिसणाऱ्या पात्राचे विहंगम दृश्य दिसू लागते. नदीचे दोन्हीही तीर परस्परांना जोडणारे कुठलेही बांधकाम आज इथे अस्तित्वात नाही.

जम्मू आणि काश्मीरच्या पर्वतीय भागांत प्रवास करणे स्थानिकांकरता अत्यंत कठीण असते. भारत सरकारने, इथे चांगली दळणवळणाची साधनसुविधा पुरवण्याची निकडीची गरज जाणून घेऊन, जम्मू आणि काश्मीर राज्याला उर्वरित भारताशी जोडणारा राष्ट्रीय लोहमार्ग निर्माण करण्याचा प्रकल्प ऑगस्ट २००३ साली हाती घेतला. हा प्रकल्प मार्च २०१६ मध्ये पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. हा लोहमार्ग जम्मू-उधमपूर-कटरा-काझीगुंड-बारामुल्ला ह्या एकूण ३४५ किलोमीटर मार्गावर घडवला जाणार आहे. जम्मू ते उधमपूर भागाचे बांधकाम पूर्ण होऊन एप्रिल २००५ मध्ये तो खुलाही करण्यात आला. उधमपूर ते बारामुल्ला ह्या मार्गावर आता काम सुरू आहे. त्यातीलही कटरा ते धरम हा ७० किलोमीटरचा मार्ग अतिशय अवघड आहे. म्हणून त्याचे बांधकाम कोकण लोहमार्ग महामंडळाला सुपर्द करण्यात आलेले आहे. अवघड चढ-उतारांच्या डोंगरी भागातूनच जात असल्यामुळे, प्रकल्पांतर्गत अनेक पूल आणि बोगदे बांधावे लागणार आहेत.


पाप ही अशी गोष्ट आहे जी लपवली की वाढत जाते.

चिनाब नदीवरला पूलही ह्यांपैकीच एक आहे. उधमपूरपासून काश्मीरला जात असताना, खोल दरीतल्या चिनाब नदीला पार करून जाण्याकरता तो उभारला जाणार आहे. १,३१५ मीटर लांब असणारा हा पूल एक अभियांत्रिकी आश्चर्यच ठरणार आहे. अनेक बाबतींत तो अद्वितीय वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणार आहे. पुलावरून जात असताना गाड्या ताशी १०० किलोमीटर वेगाने जाऊ शकणार आहेत. पुलाच्या भूकंप-प्रवणता-सोशिकतेकरता कमानीचे अभिकल्पन पक्षकर असते. म्हणून अशा संरचनेची निवड करण्यात आली आहे (२). अशा अभिकल्पनात, कमानीच्या पायांवर पडणारा पुलाचा भार नदीच्या तीरावरील उतारांना स्थिरता प्रदान करत असतो. इतर संरचनांपेक्षा पोलादी संरचना बांधणे, सांभाळणे आणि प्रसंगी तिचे पुनर्वसन करणेही तुलनेत सोपे ठरत असते. म्हणूनही पोलादी संरचनेची निवड करण्यात आलेली आहे.

ह्या भागात खूप जोरदार वारे वाहत असतात. हवेच्या वेगापुढे पूल टिकून राहील का अशा प्रकारच्या शंकाही उपस्थित झाल्या होत्या. ताशी २६० किलोमीटर वेगाने वाहणारे वारेही सोसू शकेल, असे त्याचे अभिकल्पन आता करण्यात आलेले आहे. पुलाच्या जागेवर हवेचा वेग मोजणारे उपकरण बसविण्यात येणार असून, त्यावर अवलंबून, पुलावरील गाड्यांची ये-जा स्वयंचलितरीत्या नियंत्रित केली जाणार आहे. हवेचा वेग मर्यादेबाहेर असल्यास, पुलावरून गाड्यांची ये-जा आपोआप थांबविली जाईल. त्याकरता संकेत-व्यवस्थापन सुसज्ज केले जाणार आहे.

चिनाब नदी अतिशय वेगवान आहे. तिला येणारे पूरही खूप उंचीपर्यंत चढतात. पूल त्याही उंचीच्या सुरक्षिततरीत्या वरच असायला हवा! अशा काही अपेक्षाही अध्याहृतच होत्या. त्यांचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी २००८ साली हे काम थांबविण्यात आलेले होते. अभ्यासानंतर पुनरीक्षण करून २००९ साली प्रकल्पास पुन्हा मंजुरी देण्यात आली. पुलाचे अभिकल्पन मात्र २०१२ सालीच मंजूर होऊ शकले. पूल मार्च २०१६ मध्ये पूर्ण होईल. त्याचे अनुमानित आयुष्य त्यानंतर १२० वर्षांचे असेल.





सध्या सामानाची ने-आण करण्यासाठी आणि नंतर नदीवर पुलाचे घटक बसविण्याकरता, किनाऱ्यांवर लक्षवेधी उंचीचे चार मनोरे (टॉवर्स) उभारण्यात आलेले आहेत. पहिल्या प्रकाशचित्रात दोन्ही तीरांवरील मनोरे आणि त्यांच्या रचनात्मक जागा दिसत आहेत. तर, पहिल्या प्रकाशचित्रातील लहान लहान दिसणाऱ्या काँक्रीटच्या स्तंभांचे प्रत्यक्षातील आकार नीट लक्षात यावेत म्हणून, दुसऱ्या प्रकाशचित्रात तुलनेकरता कामगारांच्या झोपड्या दाखवलेल्या आहेत. चित्रातील झोपडीवजा बांधकामे, पुलानजीकच्या रस्त्याखालील स्तंभांच्या अजस्त्रतेची पुरेशी कल्पना करून देत आहेत.

### पुलासंदर्भातील रोचक आकडेवारी (३)

पाण्यापासूनची रस्त्यांची उंची (डेक हाइट) = ३५९ मीटर
पोलादी बांधकामाची कमाल उंची = १३३.७ मीटर
मुख्य पल्ल्याच्या कमानीची एकूण लांबी = ४८५ मीटर
पुलाचे एकूण पल्ले (स्पॅन्स) = १७
एकूण पोलादी बांधकामाचे वजन = २५,००० टन
पुलाची एकूण लांबी = १,३१५ मीटर
वाऱ्याचा अनुज्ञप्त कमाल वेग = १०० किलोमीटर/तास
पुलाच्या बांधकामाचा अंदाजे खर्च = ५१२ कोटी रुपये
प्रकल्पाचा एकूण खर्च = २०,००० कोटी रुपये

देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि मग देशउभारणीच्या नवीन कामांना गती मिळाली. भाक्रा-नांगल, हिराकूंड इत्यादी धरणे बांधली गेली. जमशेदपूर, भिलाई ह्यांसारखे पोलादाचे अवाढव्य कारखाने उभे राहिले. स्वतंत्र भारताच्या उभारणीचा नवा काळ समोर आला. त्या वेळी १९५७ साली प्रदर्शित झालेल्या नया दौर चित्रपटातील एका गीतात सुप्रसिद्ध गीतकार साहिर लुधियानवी म्हणतात :

फौलादी हैं सीने अपने, फौलादी हैं बाहें ।
हम चाहे तो पैदा कर दे, चट्टानों में राहे ॥

हिमालयी, पीर-पंजाल पर्वतराशींतील चिनाब नदीपात्रासारख्या खोल दऱ्यांवर पूल बांधत आणि उंचच उंच पर्वतांतून लांबच लांब (त्यांतील एक तर सुमारे ११ किलोमीटर लांब आहे.) बोगदे खणत तयार होणारा हा लोहमार्ग आमच्यातील अशाच आंतरिक शक्तीचा प्रकट आविष्कार आहे. भारतीय जनजीवनात तो विकासाचा खरोखरीच एक ‘नया दौर’ आणणार आहे. काश्मीर खोऱ्यातील विकासाची नवीन कवाडे उघडणार आहे. कटऱ्यापासून वैष्णोदेवीस यात्रा करणाऱ्यांचे (२००१ साली सुमारे १० लाख लोकांनी वैष्णोदेवीची यात्रा केली होती) अपार कष्ट तो वाचविणार आहे. काश्मीरला अवनीतलावरील स्वर्ग मानतात. थेट ह्या स्वर्गाप्रत नेणारा लोहमार्ग स्थापन झाल्यावर स्वर्गाची यात्रा सुलभ होणार आहे. त्यामुळे काश्मिरातील पर्यटनव्यवसायास बहारीचे दिवस येणार आहेत.

आपण नेहमीच म्हणत असतो की, भारत सरकारने भारतीय जनतेस काय दिले? कोणता असा खास विकास केला? मात्र सरकार कोणत्याही पक्षाचे असो, लोकशाही व्यवस्थेत निर्माण केली गेलेली नोकरशाही, यथाशक्य प्रयत्न करतच असते. सतत विकासाचे मार्ग हुडकतच असते. शिवाय सगळ्यांनी मिळून जे प्रकल्प घडवलेले असतात, त्यांची फळे एक ना एक दिवस दृष्टीस पडतातच पडतात. असाच आपल्याला आता दिसू लागला आहे जगातील सर्वांत उंच पूल. चिनाबवरला लोहमार्गपूल. भारतीय अभियांत्रिकी इतिहासातील एक देदीप्यमान कर्तव्य! ह्यामुळे आपल्या देशाची मान जगभरात गौरवाने उन्नत होईल. एवढेच नव्हे तर आपल्याकरता आर्थिक विकासाचे नवे पर्वच उघडेल. काश्मीर खोऱ्यातील लोक उर्वरित देशातील लोकांशी घट्ट दळणवळणाच्या सोयीने जोडले जातील. शिवाय देशाच्या संरक्षणातील एक मोठी उणीव[२] कायमची दूर होईल.

**संदर्भ:**

१. नवभारत टाइम्समधला १७-०६-२०१२ रोजीचा एक लेख : http: avbharattimes.indiatimes.com /india/national-india/articleshow/ 14201564.cms

२. ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड ह्या कंपनीचे जून-जुलै २०१३ चे मुखपत्र : http:// www.afcons.com/downloads/news/2013 Efficient%20Infrastructure%20%20 worlds%20tallest%20bridge.pdf

(पृष्ठ क्र. २५ वर)

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रस्ताविक**

'दिशाच्या' डिसेंबर २०१४ च्या अंकात बुवाबाजीच्या विषयावर 'लोकसत्ता' मधील 'भोंदू भगवान' व श्रद्धेचे बाजारीकरण व त्याला 'राजकीय कवच', ह्यावरील दोन लेख, श्री. दिनेश गुणे व श्री. टेकचंद सोनावणे यांचे (पान ९ वरील २३-११-२०१४ च्या आवृत्तीत) या लेखांच्या संदर्भात भाष्य केले. त्या भाष्याची बैठक महायोगी अरविंदाच्या तात्विक दृष्टीने श्री. किशोर गांधी, ह्यांच्या भाषेतील पुस्तक 'Social philosophy of Aurobirds and the New Age'



ह्यावर चिंतन करण्याचे आश्वासन दिले होते. अरविंद म्हणतात "The most fundamental and the most difficult problem of sociology is the relation of the individual to society. A full understanding of the true nature of this relationship requires an anlysis, not only of the social, political and economic factors involved, but also of the deeper psychological, philosophical and spiritual factors."

ह्या संदर्भात कोणते आपण पुन्हा एकदा वरील लेखांचा टीकात्मक विचारांचा सवाल उभे राहतात?

संदर्भ बघा' असा, माझा आग्रह.'' त्यांत तुम्हाला भारतांतील अनेक 'बाबा, बुवा' यांच्या बुवाबाजीचा 'प्रर्दाफार्श' सामाजिक, राजकीय व आर्थिक भूमीकेवर केलेला आढळेल. दोन्ही बुवाबाजीचे दोन प्रकार म्हणजे एका बाजूला प्रत्यक्ष उदाहरणांतील अनेक बुवा त्यांना 'धार्मिक' (Religion) अशी संज्ञा प्राप्त होती व त्याच्या दुसऱ्या बाजूला भोळा समाज व राजकीय सत्ताधारी (यांची डोळेझाक), ह्यांची वर्णने आढळतील!!

पण, ह्या मुळे घडणाऱ्या,''जनजीवनांत अनावश्यक आणि अनधिकृत लुडबुड सुरु केली आहे,'' ह्यांची कारण परंपरा, जबाबदारी शेवटी कोणावर टाकली आहे?

ह्याचे उत्तर सामान्य व गुळमूळीत धारणेवर (Populist) दिलेले आढळेल !! ह्या धारणा एक तर 'धर्मावर' (Religion), नंतर 'राज्यकर्ते', राजकारणी (सगळे रंगांचे), सरकारी आर्थिक नियंत्रण सत्ता संभाळणारे, (कुंभकर्णी निद्रा) ह्याच्यावर टाकली आहे. पण, लेखकांचे निदान काय आहे?

Religion आणि Spiritual Science ह्यामधील फरक व जाणीव, समाज, बुवाबाजी, राजकारणी व इतर जबाबदार व खुद्द लेखक यांच्या विचारात 'आध्यात्मिक ज्ञानाच्या' वा अज्ञानाच्या स्तराचा विचार दिसतो का?



अजिबात नाही!! त्यांची (सर्वांची) पातळी ही भौतिकवादी बुद्धी, विश्वास व श्रद्धा ह्यामधील फरकावरचे अज्ञान, समाजाच्या भोळेपणाची जबाबदारी वाऱ्यावर किंवा फक्त 'अंध विश्वास निवारण संमितीच्या' (व तत्सम संस्था) यांच्या ज्ञानावर व एकांकी (Partisan) भौतिकवादी भूमीकेवर टाकलेली दिसेल!! भौतिकवादी सामाजिक विज्ञानात, व्यष्टि व समष्टि आणि सृष्टि यातील 'आत्मा व त्याची Consciansness ची पातळी, ह्याचा विचार बिलकुल नाही !! कारण काय तर त्या सर्व दोषी (Stake Holders) यांचा पूर्वग्रह ही आहे की 'जीवात्मा व परमात्मा' हे झूट आहे. पण हे त्यांच्या अज्ञानी विश्वासाचे दर्शन आहे वैश्विक **सत्य** (Reality of Existence) व **ऋत (Curmic Mrality)** ह्यांची ज्ञानपातळी अजिबात दिसत नाही.

हा त्यांचाही जाणीवपूर्वक अज्ञानाचा दोष नाही. हा तर 'अध्यात्म व वैश्विक मानवी वा चैतन्याच्या प्रत्यक्ष अस्तित्वांचा परस्पर संबंध' ह्याचा ज्ञानाचा अभाव हा आहे !! मग असे आढळले की ह्या सर्वांचा भौतिकवादी सामाजिक विज्ञानांत, विज्ञानांत जिथे विश्वाच्या निर्मीतीचा पृथ्वीवरील वा विश्वातील चैतन्याचा उगम वा अंत ह्याबद्दल पूर्ण अज्ञान आहे. एवढेच नव्हे तर त्यावरील हे अज्ञान नाहीसे करण्यासाठी 'अदृश्य आगम, अंर्तचक्षू, योग, भक्ति वगैरे मार्ग व वेदिक सत्य श्रुती ज्ञान उपलब्ध आहे पण, ते मिळवण्यासाठी ''श्रद्धा' ह्या आत्म वैशिष्ट्याची तपसाधनस करावी लागते, मग अंधश्रद्धा हे समाधान कसे मिळणार. **'विश्वास' हा अंधविश्वास आहे की अंधश्रद्धा आहे. ह्यातील फरक जाणला जात नाही. 'श्रद्धा' ह्या आत्म्याच्या प्रवृत्ति असतात.**

'विश्वास' हे उथळ व तत्कालीक असतात. पण, आत्म्याचे वैविक सत्य नाकारणाऱ्या भौतिकवादी विचारवंताना हे कसे उगमणार? त्यांनी मूळात जाऊन विश्वास व श्रद्धा या संकल्पनेवर विचार केलेलाच नसतो. कारण 'One time life on Earth' यावर नकळत त्यांची स्वतःची 'श्रद्धा' असते!! हे दुर्दैव आहे कीं **'भारतीय संस्कृतीचा आत्मा' त्यांना गवसलाच नाही. मानवी चैतन्याचा जन्म, मृत्यू व पुनजन्म हो फेरा त्यांना अगम्य किंवा विज्ञानविरोधी समज वाटतो. असत्य वाटतो. बुवा बाजीचा आधार वाटतो. मग भारतीय तत्वज्ञान, दर्शने यांचा प्राथमिक स्तरावरचा ज्ञानमार्ग ही त्यांना माहित नसावा असे मनोमन वाटते !!** आणि मग त्यांच्या लिखाणाचा 'भारतीय सत्यज्ञान, त्याचे सत्यमार्ग व साधना' ह्यावरचा विश्वास उध्वस्त केला जातो.

**अज्ञानी ॲक्टर व वैज्ञानिक व Secular Thinkers**

त्यामुळे डॉक्टरच अज्ञानी असेल, वैज्ञानिकच जर अर्धज्ञानी असेल तर तो रोगावर, बुवाबाजीवर काय उपचार सूचवणार?

**समाजीची धारणा सुसंस्कृत करणे आवश्यक**

पण ही अवस्था आमच्या दोन लेखकांची एकट्याची नव्हे तर संपूर्ण सामाजाची, आज दुर्दैवाने आहे!! खेद वाटतो!! असे कां असावे? हा गंभीर प्रश्न आहे.

**पण उत्तर आहे**

पण त्यावर विचार झाला आहे पण, त्याकडे पूर्णपणे

दुर्लक्ष झाले आहे. किंवा भौतिकवाद, बुद्धीवाद (Rationalist Secular thought) याच्यावर त्याचा अंधविश्वास आहे असे म्हणावेसे वाटते. ह्यामध्ये भोळसटसमाज, धार्मिक गुरु व सामाजिक, राजकीय नेते या वर्गाचाही समावेश आहे.

### आत्मज्ञानाबद्दलचा पूर्वग्रह सोडणे आवश्यक आहे

ह्या सर्वांचा खऱ्या वैश्विक ज्ञानाचा व अध्यात्मिक मानवी जीवनाचा परिचय नाही अथवा पूर्वग्रही विरोध आहे. त्यामुळे त्यांनी ‘‘Anwhipping Boy’’ सारखा भोळा समाज, राजकीय नेते, सामाजिक नेते ह्यांना एकाच काठीने झोडपले आहे व आपल्या एकांगी, निष्कर्णावर समाधान मानले आहे.

### वैचारिक प्रामाणिक संवादाचा अभाव

ह्या वैचारिक संघर्षाचा उपयोग, त्यामुळे समाजाला होणार नाही. महाभारतातील अर्जून व कौरव पांडवाप्रमाणे फक्त महायुद्ध होत राहतील.

### भगवदगीतेला सेक्यूलर विरोध



कारण त्यांना सर्वांना भगवद्गीतेतील भगवान कृष्णाचा गीता उपदेश अजूनही पोचत नाही आहे.

यदायदा ही धर्मस्य ग्लानी भवती भारत संभवामि युगे युगे..’’ या गीता वचनाप्रमाणे भगवान कृष्णाच्या अवताराची वाट पहाणे हे आपल्या नशिबी आले आहे.

### ही दुर्बलता कां?

या आपल्यावरील प्रसंगाला कारण आणखी एक आहे, ते हे की ‘भारताच्या संस्कृतीचे पुनजीवन, भारताच्या आध्यात्मिक ज्ञानाचा ‘आत्मा शोधून’ त्याला जागृत करणाऱ्या नेतृत्वाला हे राजकीय सत्तेवर जाऊ देण्यास निकराचा विरोध करतात.

### Double Opposition दोन फळ्या विरोधाच्या

केवळ हे सामाजिक सुधारणावादी व बुद्धीवादी नेतृत्वच नव्हे, तर धर्म संस्थानातील अज्ञानात 'Vested Interest' (फायदा असणारे) लाभार्थीसुद्धा त्याला सामील असतात.

### सत्यशोध व सत्यबोध कोणता?

कारण, व्यक्ती व समाज ह्यांची "Contractual Relationship" आहे मग खरा शोध व अध्यात्म शास्त्र यांचे औषध कोणते?

प्रथत महायोगी श्री. अरविंद घोष यांचा महत्त्वाचा सामाजिक शास्त्र (Social science) मधील **'Group Soul.** ह्याचा विचार बघुया

### ते म्हणता :-

"The society is an organic living being with a collecfive or rather a common or commpul Soul and mind and body.

The societ or Nation is every in its greater camplexity a larger, composite individunal, the collective MAN"

**Further, in their evolutionary course both the dividual and social organisms trace**

**the same organic cycle of birth, growth, and decay with a possibility of renewal under certain conditions.**

The **life of the society** like the physical life of the human being passes through a cycle of birth, growth, youth ripeness and decline and if this last stage goes for enough with out any arrest of its course towards decadence, it may perish... as a man dies of old age. But, the collective being has too the capscity of renewing itself of a recovery and new cycle"

(ह्या चैतन्य युक्त समाजाला पुनर्जन्माचा अधिकार आहे!)

**समाज ही जड वस्तू नव्हे त्यालाही आत्मा आहे !!**

"The physical being of the society is a subjective power, not a mere objective existenc. Much more is it in its inner self a great corporate soul witih all the possibilities and dangers of "Soul Life."

One may see even that like the individual, it essentially is a soul rather than has one, it is a Group Soul."

Society is essentially a "Spiritual view and not a Biological one, even though he admits a close identity of nature between the biological organism and the society.

Sri. Autobindo maintains that the real determinant of social phcnomena is the consciusness of society, which at its deepest is its "Soul Consciousness.

**ह्या नवीन ज्ञानाचे महत्त्व व प्रयोजन काय?**

ह्या इंग्रजीतील उताऱ्याचं प्रयोजन काय, ह्याचे कारण एकच की "Individual Soul and Group Soul" जाणणे म्हणजे अ'व्यक्तीचा जीवात्मा' व 'समाजाचा आत्मा' ह्या संकल्पना प्रथमच मांडल्या गेल्या. त्या एक वैश्चिक सत्य आहेत!!

**Relations between two souls**

त्यामुळे व्यक्ती व समाज यांच्या नातेसंबंधात स्पष्टपणा आला. व्यक्ती वा समाजाच्या काँशसनेसची भौतिक गुणवत्ता व उंची कशात मोजावयाची? भगवद गीतेत सांगितलेल्या दैवी संपदाच्या मात्रेवर

**सेक्यलर व निधर्मी भौतिकवादी नेतृत्व जबाबदार गोंधळाला**

ह्या जीवाच्या पृथ्वीवरील जीवनांत त्याची ओढ वा मागणी ही काय फक्त 'पाणी, कपडा मकान, रस्ता, अन्न' एवढीच आहे?

कारण अशी असेल तर समाजाच्या भौतिक मागण्या पुरवणारी संस्था - सरकार व राजकीय नेतृत्वाकडे जनता धाव नं घेता, बुवा, बाबा, नकली अध्यात्मगुरु, देवळं, मशीदी, चर्च याकडे कां वळते? जर ह्या फसल्या गुरु,बुवा बाबा ह्यांच्याकडून जर फसवणूक होत आहे तर असे विचारवंत त्यांना 'खरा उन्नतीचा मार्ग कां दाखवत नाहीत?

**समाजाच्या अपेक्षा कोणत्या आहेत?**

ते ये शतं मानुषा आनन्दाः । स एको मनुष्यगन्धर्वाणामानन्दः ।
श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥ (Taittiriya 2.7.2)

Te ye śatam mānushā ānandāḥ,
Sa eko manuṣyagandharvāṇāmānandaḥ ;
Śrotriyasya cakāmahatasya.

This quantum of happiness is for a person who is a श्रोत्रिय (Śrotriya) well versed in the Vedic knowledge and अकामहत: (akāmahataḥ) a person established in desirelessness. Similar lines continue in the Upaniṣad presenting the various levels called Lokās. These levels are mentioned in order; each a hundred folds greater in happiness than its preceeding level. The following table illustrates the concept portrayed therein.

| | Levels of consciousness Lokas | | Units of Ananda |
|---|---|---|---|
| 1. | मनुष्यलोकः | 1 | Manuṣyalokaḥ (Human level) |
| 2. | मनुष्य-गन्धर्वलोकः | $10^2$ | Manuṣya-Gandharvalokaḥ (Humanistic Super Being) |
| 3. | देव-गन्धर्वलोकः | $10^4$ | Deva-Gandharvalokaḥ (Godly Super Being) |
| 4. | पितॄणां चिरलोकः | $10^6$ | Pitṛṇām ciralokaḥ (Abode of the fore-fathers) |
| 5. | आजानजानदेवलोकः | $10^8$ | Ājānajānadevalokaḥ (Ignorance-born Gods) |
| 6. | कर्म देवानां लोकः | $10^{10}$ | Karma devānām lokaḥ (work based Gods) |
| 7. | देवलोकः | $10^{12}$ | Devalokaḥ (Gods) |
| 8. | इन्द्रलोकः | $10^{14}$ | Indralokaḥ (The king of Gods) |
| 9. | बृहस्पतिलोकः | $10^{14}$ | Bṛhaspatilokaḥ (Preceptor of Indra–Bṛhaspati's loka) |
| 10. | प्रजापति लोकः | $10^{16}$ | Prajāpati lokaḥ (the lord of creatures) |
| 11. | ब्रह्मलोकः | [illegible] | Brahmalokaḥ (The Creator) |

ह्या समाजाच्या मागण्या **भौतिक आहेत** कीं **आध्यात्मिक सुद्धा आहेत**? भारतातील संस्कृतीने हे प्रश्न हाताळले आहेत? ह्या विश्वाच्या उत्त्पतीबद्दल, जन्म, मृत्यू, सूख, दुःख ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे व त्यातून सुटण्यासाठी उपयुक्तअसणाऱ्या साधना व मार्गाचीही उत्तरे ह्या संस्कृतीने जोपासली आहेत.

### सेक्यलर विचारवंतांची असहिष्णुता

त्याबद्दलचे सर्वमान्य व प्रामाणिक उत्तरे किती विद्वान व विचारवंत देऊ इच्छितात कां त्यांच्याकडूनही हे ज्ञान.

ह्या ''भोळ्या'' समाजाला मिळत नाही? त्यांची अध्यात्म तहान व भूक दिसत नाही.

### युगातील खरी भुक व तहान

ह्याचे खरे उत्तर हे आहे की ह्या सगळ्या जीवात्म्याला जीवनाच्या व स्वतःच्या अस्तित्वाला जाणण्याची इच्छा आहे.


तीनों शरीरों का चित्र

स्थूल शरीर - अन्नमय कोष

सूक्ष्म शरीर
१. प्राणमय
२. मनोमय
३. विज्ञानमय कोष


कारण शरीर = आनन्दमय कोष

स्वप्नावस्था के द्वारा सूक्ष्म कारण शरीरों का सम्बन्ध

जाग्रत अवस्था के द्वारा सूक्ष्म = स्थूल शरीरों का सम्बन्ध

प्राण के द्वारा स्थूल-सूक्ष्म शरीरों का सम्बन्ध

इन्हीं तीनों शरीरों का विभाग एक और प्रकार से किया गया है जिसे कोष कहते हैं उसका विवरण इस प्रकार है–
(१) स्थूल शरीर–अन्नमय कोश
(२) सूक्ष्म शरीर–१. प्राणमय, २. मनोमय, ३. विज्ञानमय कोश।
(३) कारण शरीर–आनन्दमय कोश
योग–३ शरीर–५ कोश
इन तीनों शरीरों के दो सम्बन्ध हैं–
(१) अवस्थाओं के द्वारा सम्बन्ध।
(२) प्राण के द्वारा सम्बन्ध।



| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | लोक | वेद | व्याहृति | मात्रा | अवस्था ४ पाद | विश्वात्मा के ४ रूप | कोश | शरीर | फल | विशेष |
| १) | पृथिवी | (१) ऋक् | भूः | (३) अ | ❖❖ जागृत प्रथम पाद | वैश्वानर | अन्नमय | स्थूल | १ आदि २ व्याप्ति | The Consciousness working in the स्थूल शरीर |
| २) | अन्तरिक्ष | यजुः | भुवः | उ | स्वप्न द्वि. पाद | तैजस | प्राणमय मनोमय विज्ञानमय | सूक्ष्म | १ उत्कर्ष २ [illegible] | The Consciousness working in the स्थूल शरीर |
| ३) | (२) द्यौ | साम | स्वः | म् (४) | सुषुप्त तृ॰ पाद | प्राज्ञ | आनन्दमय | कारण | १ [illegible] २ [illegible] | The Consciousness working in the कारण शरीर from which it can make on impression on the physical brain |
| ४) | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | ●● | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | ●● That is a state beyond |

ही इच्छा आत्म्याची आहे!!

''असतो मा सद्‌गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतम्‌ गमय !

या वेदिक मंत्रामध्ये मांडली गेली आहे, त्याला कमीत कमी १०,००० वर्षे झाली आहेत. पण ही उत्तरे ह्या साधनेने मिळणार आहे व ती सध्याच्या मानवाला 'Self Realisation' 'उथळ ज्ञानमार्गान' मिळणे अशक्य आहे. खरा मार्ग 'आत्म्याच्या अभ्यासाचा आहे.

पण ही Aspiration 'अभीप्सा' फक्त 'चित्तात' संभावली जाते. जन्म, मरण, पुनर्जन्म ह्या संसार चक्रातून फिरतांना मानवी फॉर्ममध्ये 'कणा कणाने' वाढून संपन्न होते. शारिरीक मृत्यूनंतर हा आत्मा आपले शरीर सोडून 'सूक्ष्म शरीरात राहून' संसार चक्रांत सामील होतो. ह्या सूक्ष्म-शरीरात चित्त आहे ते या स्मृती ठेवते व सांठवते 'आत्म्याच्या' उपयोगासाठी हे चित्त 'अंतःकरण चतूष्ट्याचा' अदृश्य भाग आहे.

चित्त, बुद्धी, मन, अहंकार हे ते चतुष्ट्य आहे. पातंजल योगाच्या साधनेने ह्या चित्तात, आत्मदर्शन, आत्मबोध, आत्मसंस्कार होऊ शकतो. पण ह्या रहस्याची जाणीव व उलगडा होण्यास प्रयत्न करावे लागतात. अशा प्रयत्नांना परमात्म्याचे सहाय्य व आशीर्वाद मिळतो. पण ह्या प्रयत्नांना एक तऱ्हेच्या अविचलित, निरंतर जपसाधनेची की जन्मजन्मांतर ''संसार चक्रातील'' प्रत्येक संधीचा फायदा उठवायला उत्सुक असावी लागते. त्या विश्वासाला जागृत करण्यासाठी आत्म्याच्या सत्य अस्तित्वातील सत्य श्रद्धेची आराधना, साधना प्रत्येक जन्मात करावी लागते!!



त्यामुळे केवळ बुवाबाजी, धार्मिक बुवाबाजीवर हल्लाबोल करुन व राजकीय नेतृत्वाची स्वार्थ, भ्रष्टाचाराची ओढ व पतन ह्याकडे 'अगुली निर्देश करत' जबाबदारीतून सुटका होत नाही तर त्या दृष्टीने पावले टाकण्यासाठी जनजागृती करावी लागले. हा प्रामाणिक स्वभाव असायला लागतो.

॥ हरि ॐ ॥

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

(पृष्ठ क्र. ८ वरून **काश्मीरची कळी खुलणार का?**)

**संदर्भ**

स्कॉफील्ड व्हिक्टोरिया - काश्मीर इन द क्रॉसफायर
चंद्रा बिपिन, मुखर्जी मृदुला, मुखर्जी आदित्य - इंडिया अफ्टर इंडिपेन्डन्स
राघवन श्रीनाथ - वॉर अँड पीस इन मॉर्डर्न इंडिया
नुरानी ए. जी. - आर्टिकल ३७० - टू अ कॉन्स्टिट्यियुशनल हिस्ट्री ऑफ जम्मू अँड काश्मीर
वसुदेव वीना - काश्मीर इम्ब्रोग्लियो
वर्ल्डबुक एन्सायक्लोपीडिया

**सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

●●●

(पृष्ठ क्र. १३ वरुन **नर्मदा परिक्रमा**)

लावून झाकलेल्या. दारे बसविलेली नाही. (प्रवेशद्वार उघडे) खोलीत फरशा नाहीत. टाकलेल्या स्लॅबवर, सिमण्ट पावडर असलेले फ्लोअरिंग इत्यादी दिवेही नव्हते, मात्र एक कंदील लावून आणून दिला होता. खोली पाहिल्यावर मी थोडा नाउमेद झालो, पण नंतर सारे आनंदाने स्वीकारले. खरे म्हणजे दुकानाच्या/मकानाच्या बाजूला वेगळ्या जागेत धान्यगोदाम आहे तिथे सोय केली होती, परंतु रात्री माल येणार असल्याने आम्हांला वरची अपूण जागा मिळाली. खाली गोदामात उंदीर होते, वरती मात्र नव्हते.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# प्रकल्प अहवाल

*यशस्वी उद्योगासाठी प्रकल्प अहवालाचे महत्त्व असते. याचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*

मनसा चिन्तितं कर्मं वचसा न प्रकाशयेत्
अन्यलक्षितकार्यस्य यत: सिद्धिर्न जायते

आपल्या मनातील योजना कुणालाही सांगू नयेत, त्या जर दुसऱ्याला सांगितल्या तर कार्य सफल होत नाही असा वरील श्लोकाचा अर्थ आहे. परंतु आजच्या काळात मात्र प्रस्तावित उद्योगाची परिपूर्ण योजना तयार करावी लागते, यालाच प्रकल्प अहवाल म्हणतात. हा अहवाल इतरांकडून सहकार्य मिळविण्याकरीता विशेषतः आर्थिक सहकार्य मिळविण्याकरिता त्यांच्यासमोर मांडावा लागतो. अर्थात काय मांडायचे आणि काय लपवायचे हे आपल्या हातात असते. यासाठी प्रकल्प अहवालाचे दोन भाग करता येतील. एक सरसकट सगळ्यांसाठी आणि दुसरा वित्तीय तपशिलांचा निवडक लोकांसाठी. व्यवसायाचा निर्णय घेताना आपले मित्र, नातेवाईक, हितचिंतक, परिवारातील लोक यांच्याशी चर्चा कराच. यातून तीन गोष्टी साधतील. काही धोक्यांची जाणीव. जी तुम्हांला झाली नाही ती कदाचित त्यांना होईल, चांगले सल्ले मिळतील आणि त्यांना तुम्ही विश्वासात घेतले असल्याने भविष्यात काही अडचण आली तरी त्यांचा पाठिबा मिळेल. आता तुम्ही उद्योग करायचा निर्णय घेतलाच आहे तर हे सगळे कागदावर मांडावे लागेल. हा लेख केवळ प्रकल्प अहवाल म्हणजे काय, त्यात कोणकोणत्या गोष्टींचा विचार केलेला असतो, प्रकल्प अहवालाचा उपयोग काय, हे सांगण्यासाठी आहे. प्रकल्प अहवाल याप्रमाणेच तयार करावा असे अपेक्षित नाही. कारण व्यवसायाच्या स्वरूपानुसार त्याची रचना वेगवेगळी असू शकते.

प्रकल्प अहवालाचा मुख्य उद्देश उद्योगासाठी पैसा उभा करणे हा असला तरी उद्योजकाच्या दृष्टीने तो साध्यापर्यंत पोहचण्यासाठीचा कृतिआराखडा असतो. चाणक्या नीती सांगते दृष्टिपूतं न्यासेत्पादं. याचा अर्थ असा कि पाऊल पुढे टाकण्यापूर्वी त्याने डोळ्यांनी नीट पाहून घ्यावे की त्याचा मार्ग मोकळा आहे. वाटेत एखादा दगड अथवा खड्डा आला तर पडायला होईल. उद्योजकाने ज्या मार्गावरून प्रवास करायचा आहे त्यातील अडचणींची माहिती आधीच गोळा केली आणि त्यावर सुनिश्चित उपायोजना ठरवली तर हा उद्योजकतेचा प्रवास निर्विघ्नपणे होऊ शकेल. आपल्याला खूप वाटते की हा उद्योग नक्की फायदेशीर होईल. सुरळीत चालेल. परंतु आपली अंत:प्रेरणा तेव्हाच वास्तवात येऊ शकते जेव्हा तिला माहितीची अथवा आकडेवारीची जोड मिळते. प्रकल्प अहवाल जेव्हा आपण कागदावर मांडू लागतो तेव्हाच खऱ्या अर्थाने संभावित धोके आणि संधी स्पष्ट होतात. आपले संभाव्य ग्राहक कोण आणि त्यांची मानसिकता काय आहे, स्पर्धेची तीव्रता किती आहे आणि तिला तोंड कसे देता येईल या सगळ्यांचा आराखडा या निमित्ताने तयार होतो. किती कालावधीत आपल्याला लक्ष्य गाठायचे आहे याचे वेळापत्रक बनते. आपल्या व्यवसायाची मूल्ये काय असतील, काय करायचे आणि काय टाळायचे, व्यवहार करताना कोणती काळजी घ्यायची यासंबंधी आपले विचार अधिक सुस्पष्ट होत जातात. उद्योगाची नाव यशस्वीपणे किनाऱ्याला लागण्यासाठी प्रकल्प अहवाल आपल्याला योग्य दिशा दाखवतो. अतिशय अस्थिर अशा काळात टिकून राहायला आणि योग्य

मार्गावर येण्यासाठी मदत करतो. आपल्या उद्योगाच्या प्रगतीचे मूल्यमापन आपण प्रकल्प अहवालाच्या आधारे करू शकतो.

प्रकल्प अहवाल म्हणजे आकड्यांचा खेळ नव्हे. कागदावरचे आकडे प्रत्यक्षात किती येतील हे येणारा काळच ठरविणार असतो. त्यामुळे प्रकल्प अहवाल लिहिताना तज्ज्ञ व्यक्तीची मदत घेतलेली केव्हाही चांगली. कारण हे आपल्या व्यवसायाचे अंदाजपत्रक असते, ते जर चुकले तर पुढची सगळीच गणिते चुकतील आणि उद्योग धोक्यात येईल.

प्रकल्प अहवालाची मांडणी विशिष्ट पद्धतीची असते. सुरुवातीला अहवालाचा गोषवारा असतो. ज्यांना पूर्ण अहवाल वाचायला वेळ नाही त्यांना यावरून अहवालात काय आहे याची कल्पना येते. यानंतर खऱ्या अर्थाने अहवालाची सुरुवात होते. प्रस्तावनेत या उद्योगाचे प्रवर्तक कोण, त्यांची शैक्षणिक पात्रता, तांत्रिक कौशल्य, उद्योगासंबंधीचा अनुभव, उद्योगाचे स्वरूप, कोणत्या वस्तूचे उत्पादन करणार, तो शोध तुमचा आहे का, त्याचे स्वामित्वहक्क घेतले आहेत का, व्यवसाय लघु, मध्यम की मोठ्या प्रमाणावर करणार, व्यवसाय ठिकाणाची अनुकूलता, कच्च्या मालाची उपलब्धता, कुशल कामगारांची उपलब्धता इ. माहिती अगदी थोडक्यात दिलेली असते आणि त्याचबरोबर प्रस्तावित उद्योग यशस्वी होण्याची खातरी दिलेली असते.

उद्योगासाठी भांडवल उभे करणे हे सगळ्यांत जिकिरीचे काम. गुंतवणूकदारांनी आपल्या व्यवसायात पैसा का गुंतवावा? त्याच्यावर त्यांना किती परतावा मिळणार? कर्ज घेणार असू तर ते कसे परत करणार? त्यासाठीचे नियोजन काय आहे? हे सर्व दाखविण्यासाठी अहवालातील वित्तीय नियोजनाचा भाग खूप महत्वाचा असतो.

उद्योग उभारण्यापूर्वीच जमाखर्चाचा अंदाज करून हे सगळे कागदावर दाखविणे खरोखरच कौशल्याचे काम आहे. साधारणपणे कोणताही उद्योग सुरू करताना स्थिर भांडवल आणि खेळते भांडवल आवश्यक असते. स्थिर भांडवल म्हणजे जागा, इमारत, यंत्रसामग्री, हत्यारे, फर्निचर, वाहन इ. आणि खेळते भांडवल म्हणजे कच्चा माल, वाहतूक खर्च, इंधन, वीज, पाणी, वेष्टन, प्रशासकीय आणि इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, यंत्र देखभाल दुरुस्ती, कार्यालयीन खर्च, विपणन खर्च, कर इ. स्थिर भांडवल उभारण्याकरीता स्वनिधी किती असेल? कर्ज किती घ्यावे लागेल? मुख्य म्हणजे सुरुवातीला लागणारे खेळते भांडवल कसे उभे करणार? बहुतांशी उद्योग पहिली एकदोन वर्ष चांगले चालतात आणि नंतर अडचणीत येतात- कारण.... खेळत्या भांडवलाची कमतरता. विक्री वाढविण्याकरिता माल उधारीवर दिला जातो, वसुली योग्य पद्धतीने झाली नाही आणि बाजारात पैसा अडकला कि सगळा कारभार ठप्प होतो. हे टाळण्याकरीता किती वस्तूंचे उत्पादन घ्यायचे, त्याची किंमत काय असेल, विक्रीतून किती पैसा उभा राहील आणि त्यातून नफा किती मिळू शकेल, या सगळ्याचा अंदाज करून साधारणपणे पुढील वर्षात व्यवसायवृद्धी कशी होईल हे लक्षात घेऊन वर्षाचे अंदाजित नफातोटा पत्रक आणि ताळेबंद तयार केले जातात. त्यातील स्थिर भांडवली खर्च, महसुली खर्च (Revenue Expenditures) विक्री आणि रोख प्रवाह पत्रक (Cash flow statement) यांची स्वतंत्र टेबले दिलेली असतात.

व्यवसाय आर्थिकदृष्ट्या कसा व्यवहार्य आहे हे दाखविण्याकरीता काही वित्तीय विश्लेषण तंत्रांचाही वापर केला जातो. उदा. गुंतवणुकीवरील परतावा, ना नफा ना तोटा उत्पादन पातळी, पुनर्लाभ कालावधी (payback period), निव्वळ विद्यमान मूल्य (Net Present Value) तसेच आंतरिक परतावा दर (IRR), अनुपात विश्लेषण (Ratio Analysis) इ.

---

प्रार्थना म्हणजे ईश्र्वराच्या जवळ जाण्याची शक्ती.

वित्तीय विवेचनानंतर व्यवसायाच्या निर्णयाप्रत येताना व्यवसाय व्यवहार्यतेचा आपण जो अभ्यास केलेला असतो त्याचे निष्कर्ष इतरांच्या माहितीसाठी मांडावेत. यांत उद्योगाच्या भविष्याचे सकारात्मक चित्र उभे करायचे असते. उद्योगासाठी सरकारी धोरण, पायाभूत सुविधांची उपलब्धता म्हणजे वीज, पाणी, दळवळण सुविधा, बँक, पोस्ट, पूरक उद्योग, इ. गोष्टी कशा अनुकूल आहेत हे सांगावे. बाजार सर्वेक्षणाचे निष्कर्ष जसे की आपल्या उत्पादनाचा दर्जा/गुणवत्ता प्रचलित उत्पादनांपेक्षा कसा श्रेष्ठ आहे, त्याची अद्वितीय वैशिष्ट्ये ज्यांचा लाभ आपण उत्पादनाची विक्री करताना उठवू शकू, त्याची किंमत किती असेल, आपली किंमत स्पर्धकांच्या किमतींच्या तुलनेत आणि उत्पादनाचा दर्जा - देत असलेल्या सेवेला योग्य कशी आहे, उपलब्ध बाजारपेठ, बाजारपेठेतील सध्याची वस्तूची मागणी आणि पुरवठा स्थिती, स्पर्धक कोण कोण आहेत, त्यात आपले उत्पादन दर्जा आणि गुणवत्तेच्या जोरावर स्वतःचे स्थान कसे निर्माण करेल, ग्राहकांची मानसिकता, वितरणाची साखळी, विक्री संवर्धन कसे करणार, त्यासाठी काही वित्तीय तरतूद केली आहे का या सगळ्यांचे विवेचन आपल्याला यात करावे लागेल.

अशा पद्धतीने केलेला प्रकल्प अहवाल तुम्हांला आत्मविश्वास तर देईलच आणि भविष्यातील घातक परिणामांपासूनही वाचवेल. थोडक्यात काय, उतावळेपणाने कृती करून परिणाम काय होतील याची चिंता करण्यापेक्षा नियोजनबद्ध कृती करून अपेक्षित परिणाम साधा.

**डॉ. सौ. अनघा गोखले**
वि. प्र. मं. चे महर्षी परशुराम अभियांत्रिकी
महाविद्यालय, वेळणेश्वर.
e-mail : anagha.gokhale@vpmmpcoe.org
भ्रमणध्वनी-९८५०८९०३८२

●●●

(पृष्ठ क्र. १६ वरून **विकासवेध- : चिनाब नदीवरला लोहमार्ग पूल**)

३. लोहमार्ग-तंत्रज्ञानावरचे अधिकृत संकेतस्थळ http: //www.railway-technology.com/ projects/ chenab-bridge-jammu-kashmir/

[१]इथे उंचीचा अर्थ, पुलावरील रस्त्याची उंची असा घ्यावा.

पुलावरील रस्त्याची उंची (डेक हाइट): पुलावरील रस्त्याची, तळातील निम्नतम जमिनीपासूनची वा पाण्याच्या पातळीपासूनची कमाल उंची. ही मीटर्समध्ये मोजली जाते.

पुलाच्या बांधकामाची उंची (स्ट्रक्चरल हाइट): पुलाच्या बांधकामातील सर्वोच्च बिंदूपासून (उदाहरणार्थ टांगत्या पुलाकरता मनोऱ्याच्या टोकापासून) तर पुलाचे बांधकाम निम्नतम पातळीवर जिथे जमिनीतून वर येत असते तिथपर्यंतची कमाल उंची. ही मीटर्समध्ये मोजली जाते.

[२]१९४७ साली काश्मीरवर पाकीस्तानने केलेल्या हल्ल्यात त्यांनी जवळपास एक तृतियांश काश्मीर खोऱ्यावर ताबा मिळवला. दळणवळणाच्या सोयीअभावी तेव्हा आपण त्या भूभागाचे संरक्षणही करू शकला नव्हतो आणि मग नेहमीकरता पाकव्याप्त काश्मीरची कटकट निर्माण झाली होती.

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# ‘अवती भवती’

*अनेकविध स्वभावाच्या व्यक्तींचे विश्लेषण करुन देणारा लेख - संपादक*

दैनंदिन व्यवहारामध्ये आपल्याला अनेकविध स्वभावाच्या व्यक्ती भेटतात. यांतील काही लोक आपल्या समंजस, आनंदी व सहकारी वृत्तीने सर्वांची मने जिंकतात. अशा लोकांचा सहवास आपल्याला हवाहवासा वाटतो. दुसऱ्यांना समजून घेणारी, सर्वांना प्रोत्साहन देणारी व्यक्ती आपल्या आचरणाने वातावरण प्रसन्न ठेवते - मग ते घर असो वा कार्यालय. पण याच्या विपरीत स्वभावाच्या व्यक्तीसुद्धा आपल्या वाट्याला येतात. सतत नकारात्मक बोलणाऱ्या, अविचारी कृत्य करून दुसऱ्यांना त्रास देणाऱ्या, अहंकारी व स्वत:ची प्रौढी मिरवणाऱ्या अशा व्यक्ती घरातील वा कार्यालयातील वातावरण अस्थिर करतात. सूचनेचा वा उद्बोधनाचा यांच्यावर परिणाम होत नाही. अशा व्यक्तींना त्यांच्या या स्वभावामुळे सामाजिक/सामूहिक कार्यक्रमांमध्ये टाळले जाते. त्यांना वाळीत टाकले जाते. मित्रांनो, रोगाची लक्षणे दिसली की आपण त्यांकडे दुर्लक्ष करीत नाही. रोगाचे निदान करतो. स्वभावदोषांच्या बाबतीत आपला दृष्टिकोन असाच हवा. घरात किंवा कार्यालयात आपल्याला सामान्यत: खालील स्वभावदोष आढळतात:

**१) हुकूमशहा :** अशी व्यक्ती स्वत:ची मत / आवडीनिवडी दुसऱ्यांवर लादते. शिस्तीच्या नावाखाली स्वत:ची सत्ता गाजवायला यांना आवडते. इथे अहंभाव आढळून येतो. दमदाटी करून, वाद निर्माण करून ते आपले काम साधतात. वास्तवात अशा व्यक्तीने त्याच्या लहानपणी अशीच हुकूमशाही तिच्या पालकांकडून, भावंडांकडून किवा मित्रांकडून अनुभवलेली असते. स्वत:ला ‘शक्तिशाली’ सिद्ध करण्यासाठी ते मग स्वत: हुकूमशाही होतात. हुकूमशाही व्यक्ती स्वत:तील न्यून/भय लपविण्यासाठी दुसऱ्यांना दाबण्याचा प्रयत्न करते. अशा व्यक्तीला प्रत्यक्ष भेटून, नजरेला नजर देऊन, आत्मविश्वासाने सांगावे, ‘तुमच्या अशा वागण्याने मला त्रास होतो.’ हे सांगताना हसणे, भावनिक होणे टाळावे. तसेच शब्दांची जत्रा न मांडता मुद्देसुद बोलावे. त्या व्यक्तीला तुमच्याकडून कोणती अपेक्षा आहे, ते तुमच्या कामाच्या व्याप्तीत बसते का हे स्पष्ट करून घ्यावे. त्याची अपेक्षा अवास्तव असेल तर त्याला तसे सांगावे. पण त्याच वेळी तुम्ही स्वत: कामात ‘हलगर्जीपणा’ (Negligence) करीत नाही ना याची खात्री करून घ्यावी.

**२) मुखवटाधारक :** ज्युलियस सीझरचा घात करणारा त्याचा जिवलग मित्र बूट्स आठवला का? तसेच हे मुखवटाधारक तुमच्यासमोर तुमची स्तुती करणारे, पण पाठ वळताच खंजीर खुपसणारे. तुम्ही एखादी खाजगी बाब त्यांना विश्वासाने सांगता आणि हे मुखवटाधारक त्यात ‘मीठ-मिरपूड’ टाकून अफवा पसरवतात. घरात नवराबायकोचे भांडण झाले की, लगेचच सर्व सोसायटीला बातमी पुरवणारी जाऊबाई किंवा साहेबांनी दिनेशला दिलेल्या मेमोची खबर ऑफिसमध्ये पसरवणारा त्याचा सहकारी सर्व त्यांतलेच.

अशा व्यक्तीशी वागताना ‘कुछ तो लोग कहेंगे, लोगोंका काम है कहना!’ हे काही अंशी खरे असले तरी तुमची निष्क्रियता मुखवटाधारकांना प्रोत्साहन देईल. अफवा कोणी पसरवली, त्यात किती तथ्य आहे त्याने कितपत नुकसान शक्य आहे, ती व्यक्ती वारंवार तुमच्या बाबतीत अफवा पसरवत आहे, का याचा विचार करावा. ती व्यक्ती दोषी असल्यास त्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटून, संयम राखून जाब विचारावा. अशा वेळी रागावणे टाळावे. Don't let you moods ride you.. त्याने पुन्हा अशी अफवा पसरवू नये अशी स्पष्ट सूचना द्यावी. तुमचे मित्र जर असे असतील

तर पुन्हा विचार करा. Filter your friends. कुसंगती असण्यापेक्षा एकटं राहणे योग्य.

**३) विचलित वृत्ती :** एक ना धड भाराभर चिंध्या अशी ही व्यक्ती. हातातले काम अर्धवट टाकून लगेच दुसरे काम करायला लागते. अस्थिरता, मनात अवाजवी शंकाकुशंका, गोंधळून जाणे. कामाच्या सुरुवातीला भरपूर उत्साह असतो पण नंतर तो मावळतो.

**४) नकारघंटा :** कोणतेही काम सांगितले की 'नन्ना'चा पाढा वाचतात. 'जबाबदारी म्हणजे संकट' असा यांचा समज असतो. कामाला नकार देण्याची कारणेसुद्धा गमतीदार असतात. 'आज माझा उपवास आहे म्हणून मला हे काम जमणार नाही.' किंवा 'मला शद्धलेखन जमत नाही त्यामुळे टंकलेखनाचे काम नको.' अभ्यास म्हटला की लगेच शंभर कारणे सांगणारे आपले काही विद्यार्थी मित्रही असेच. 'गणित जमत नाही, इंग्रजी समजत नाही, इतिहास आवडत नाही' इत्यादी.

**५) निरंतर नंतर :** 'कल करे सो आज कर, आज करे सो अर्बी!' हे या लोकांना पटत नाही. 'नंतर बघू,' 'उद्या करू,' 'काय घाई आहे' अशी वाक्ये आपल्याला यांच्याकडून ऐकायला मिळतात. 'तहान लागल्यानंतर विहीर खणणे' हा यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. आपल काम दुसऱ्यांवर कस लादता येईल या विचारात हे मग्न असतात.

अशा व्यक्तींशी वागताना विचलित वृत्ती, नकारघंटा व निरंतर नंतर व्यक्तींना व्यक्तींना गरज आहे प्रोत्साहन व प्रलंबनाची. 'संघवृत्तीला' या तिन्ही प्रकारच्या लोकांचा स्वभाव मारक ठरतो. त्यांना वेळेचे महत्त्व, नियोजन व व्यवस्थापन समजावणे आवश्यक आहे. मर्यादित वेळेत दिलेले काम पूर्ण करण्याची शिस्त लावावी. अशा वेळी 'बक्षीस व शिक्षा' (Reward & Punishment) याचा वापर करावा. आत्मविश्वास येण्यासाठी, त्यांना निष्क्रियतेतून बाहेर काढण्यासाठी कृतिशील उपक्रम द्यावे. यामुळे कामाचे समान वाटप होईल व सहकारवृत्ती वाढेल.

**६) एकटा जीव सदाशिव :** एकलकोंड्या, अलिप्त, स्वत:चा विश्वात हरवलेल्या अशा व्यक्ती चर्चेत सहभागी होत नाहीत, आपले मत व्यक्त करीत नाहीत. याची कारण भीती, न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव किंवा एखादी मानसिक समस्याही असू शकते. मित्रांनो, अत्यंत अभ्यासू, जिज्ञासू, अनोख्या कल्पना असणाऱ्या व्यक्ती अशा असतात. वायफळ गप्पागोष्टी व वेळ घालवण्यापेक्षा कामात मग्न राहणे यांना आवडते.

अशा व्यक्तींशी वागताना माणूस हा सामाजिक प्राणी आहे. प्रत्येकाचं एक 'खाजगी' आयुष्य असतं, पण समाजात वावरताना प्रत्येक व्यक्तीने विचारांची देवाण-घेवाण केल्यास ती स्वत: अद्ययावत राहील. अलिप्त राहणाऱ्या व्यक्तींना चर्चेत सहभागी करावे, त्यांचे अनुभव कथन करण्यास संधी द्यावी. संघकामात जबाबदारीचे कार्य द्यावे. मानसिक/भावनिक समस्या असल्यास समुपदेशन आवश्यक आहे.

**७) सुपरमॅन :** सर्व कामे स्वत:वर ओढावून घेणे हा यांचा छंद. 'माझ्याशिवाय हे काम पूर्णच होणार नाही' किंवा 'फक्त मीच हे काम योग्यरीत्या करू शकते' असा यांचा समज असतो. परिणामी त्यांच्या वाट्यास येतो थकवा व तणाव. अनेक वेळा कुटुंबातील स्त्रिया या भूमिकेत दिसतात. कुटुंबातील अन्य व्यक्तीसुद्धा कामाला हातभार लावू शकतात. पण सर्व काही स्वत:च करण्याचा अट्टाहास स्त्रिया करतात आणि दिवसाच्या शेवटी कुरकुरत असतात. अशा व्यक्तीशी वागताना : अशा व्यक्तीला 'कामाचे वाटप' करण्यास सांगावे. दुसऱ्यांना शिकण्याची संधी देणे महत्त्वाचे हे त्या व्यक्तीला पटवून द्यावे. त्यांना 'Take it easy' चा मंत्र सांगावा. मित्रांनो, आनंदी जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे, 'समतोल'! दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला हे सत्य आहे. सक्रिय व्हा. नवीन गोष्टी शिकायला तत्पर राहा. 'Take one day at a time' दुसऱ्यांना दोष न देता स्वत:मध्ये सुधारणा करा. शिकण्यास उत्सुक राहा. 'तमसो मा ज्योतिर्गमय'.

**ज्योती सीताराम शिंदे**
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

# आकाश टॅबचा अध्ययन - अध्यापन पद्धतीत वापर : एक अभिनव उपक्रम

*कोकणातील प्राथमिक व माध्यमिक शाखांमध्ये संगणक व आकाश टॅबचे प्रशिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात येतात यासंबंधीचा लेख - संपादक*

अलीकडच्या काळात शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षणक्षेत्रातील हे बदल प्रामुख्याने शिक्षणपद्धतीत, शैक्षणिक सिंद्धान्तां व अध्ययन अध्यापनाच्या तंत्रामध्ये होत आहे. सर्वच ज्ञानशाखांचे मूलभूत शिक्षण प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये दिले जाते व दिवसेंदिवस अनेक ज्ञानशाखा नव्याने विकसित होत आहेत. यामुळे सातत्याने अभ्यासक्रमात बदल केले जात आहेत. हे ज्ञान व त्यासंबंधीची माहिती केवळ पाठ्यपुस्तकाने शिकवणे अशक्य होत आहे. त्यासाठी विविध डेटाबेसेस इंटरनेटवर उपलब्ध आहेत. या डेटाबेसेसच्या वापरासंबंधी भारतात मोठ्या प्रमाणात उदासीनता दिसून येते. हे डेटाबेस वापण्यासाठी संगणक, इंटरनेट, टॅब याविषयीचे ज्ञान अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना नसते. शहरामध्ये हळूहळू या तंत्रज्ञानाचा वापर सरू झाला आहे. मुंबई, नाशिक, पुणे या ठिकाणी शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचा संयुक्त वापर करत असल्यामुळे अध्ययन - अध्यापन पद्धतीत आमुलाग्र बदल झाले आहेत. परंतु महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अजूनही या तंत्रज्ञानाविषयीची व डेटाबेसची तोंडओळखदेखील झालेली नाही.

राज्य शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन शालेय स्तरावर आय. टी. विषय अनिवार्य केला आहे. परंतु याविषयी प्रशिक्षण व कार्यशाळा कमी प्रमाणात घेतल्यामुळे आय. टी. चे मूलभूत ज्ञान असलेले शिक्षक शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत.


तंत्रज्ञानक्षेत्रात झालेल्या या प्रगतीचा फायदा खेड्यातील शाळांना व्हावा तसेच शहरातील प्रगती व खेड्यातील शिक्षणव्यवस्था यांतील दरी भरून काढावी या उद्देशाने महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करत असते. यासाठी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने दि. १३ व १४ सप्टेंबर २०१२ रोजी ''संगणकाचा अध्यापन, व्यवस्थापन व सुसंवाद-संपर्कासाठी उपयोग'' ही कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेतील कोकणातील प्राथमिक व माध्यमिक शाळांत २२ शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. १ व २ डिसेंबर २०१२ रोजी याच विषयावर दुसरी कार्यशाळा घेतली व त्यात ७० शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

संगणकाचे प्रशिक्षण देणारी तिसरी कार्यशाळा ही नावीन्यपूर्ण ठरली, कारण भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय. टी.), मुंबई या संस्थेच्या आकाश टॅब विभागाच्या प्रमुख डॉ. माधुरी सावंत यांनी या कार्यशाळेतील शिक्षक प्रशिक्षणार्थींना आकाश टॅब चा अध्यन- अध्यापन पद्धतीत वापर या विषयावर मार्गदर्शन केले. कोकणात पहिल्यादांच आकाश टॅबचा वापर अध्ययन-अध्यापनात कसा करायचा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या आकाश टॅब च्या प्रशिक्षणाचा वापर कोकणातील शाळाशाळांमधून व्हावा व कोकणातील विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील डेटाबेस वापरून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक मनोरंजक, दर्जात्मक व प्रायोगिक बनावी असा मानस विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व्यक्तयांनी केला.

डॉ. विजय बेडेकर यांच्या प्रयत्नास यश आल्यामुळेच महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर व भारतीय प्रौद्योगिक संस्थान (आय. आय. टी.), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जानेवारी २०१३ रोजी गुहागर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कुल, वेळणेश्वरच्या ८वी व ९वी च्या ७६ विद्यार्थ्यांना आकाश टॅबचे वितरण करण्यात आले. यासाठी आकाश-२ टॅब प्रकल्पाचे प्रमुख व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय. टी.) मुंबईतील संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख पद्मश्री डॉ. दीपक फाटक यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रकल्पाच्या पुढील कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्रकल्प समन्वयक डॉ. किरण खोसला यांनी केले.

शैक्षणिक वर्ष २०१४ ते २०१५ या कालावधीत सातत्याने वेळणेश्वर हायस्कूल येथील विद्यार्थ्यांना आकाश-२ टॅब चा वापर करण्याविषयीचे प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई व संगणक विभागाच्या विविध प्राध्यापकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. आकाश टॅबचा वेगवेगळ्या प्रकारे अध्यन अध्यापनात उपयोग केला गेला. विद्यार्थ्यांनी स्वत:चे पाठ रेकॉर्ड केले. गावातील विविध व्यवसायाची माहिती प्रत्यक्ष व्यवसायिकांकडे जाऊन रेकॉर्ड केली. ती माहिती वर्गातील इतर विद्यार्थ्यांशी शेअर केली. आकाश टॅबमुळे मुलांच्या अध्ययनात मनोरंजकता तर आलीच, पण मुलांची ग्रहणय क्षमता व अभिव्यक्ती क्षमतांचादेखील चांगला विकास झाला. या उपक्रमाची यशस्विता पाहून आय. आय. टी., मुंबईच्या आकाश टॅब विभागाने आणखी १५० आकाश टॅब दिले आहेत.

कोकणातील एका शाळेला प्रशिक्षण दिलेला हा प्रायोगिक उपक्रम पुरेसा नव्हता. संगणक व त्यासंबंधी तंत्रज्ञान कोकणातील इतर शाळांना मिळावे ही जिज्ञासा डॉ. विजय बेडेकर यांच्या मनामध्ये सतत होती. यासाठी त्यांनी कोकणातील शिक्षकांमध्ये आकाश-२ टॅबसंबंधी जागृती वाढावी म्हणून उपक्रम राबविण्यास सांगितले.



**आकाश टॅब मिळालेले वेळणेश्वर शाळेचे विद्यार्थी व मान्यवर**

कोकणातील शासकीय शाळांमध्ये वर्षातून दोन वेळा सहविचार मंचाचे विभागवार आयोजन केले जाते. अनेक शाळा या कार्यक्रमास उपस्थित असतात. या सहविचार मंचाचा उद्देश शिक्षणक्षेत्रातील नवनवीन कल्पना, तंत्रज्ञान यांविषयी व्याख्यान व प्रात्यक्षिके घेणे हा आहे तसेच अध्ययन अध्यापन पद्धतीत होणारा बदल, आय. टी. चा शिक्षणातील वापर, ज्ञानरचनावाद या शिक्षणपद्धतीचे उपयोजन इ. विषयांशी संबंधित मार्गदर्शन केले जाते.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी या संधीचा फायदा करून घेण्याचे ठरविले व शैक्षणिक वर्ष २०१३ ते २०१४ या वर्षात झालेल्या सहविचार मंचच्या शिबिरात जागतिकीकरणाचा शिक्षणपद्धतीत झालेला परिणाम या विषयावर ठिकठिकाणी व्याख्याने दिली. यात चिपळूण तालुक्यातील ४६ शाळा नऊ सहविचार मंचांच्या केंद्रावर एकत्र जमल्या होत्या. या व्याख्यानांत जागतिकीकरण व शिक्षण यांचा संबंध सांगण्यात आला व शिक्षणाचे जागतिकीकरण होण्यासाठी संगणकाची आवश्यकता पटवून देण्यात आली.

चालू शैक्षणिक वर्ष २०१४ ते २०१५ मध्ये चिपळूण व गुहागर तालुक्यातील आठ विविध शाळांमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व्याख्याने व प्रात्यक्षिके

करून दाखविली. आकाश टॅबचा शिक्षणातील वापर या विषयावर व्याख्याने देण्यात आली. यात वेळणेश्वर हायस्कूलमध्ये वर्षभर विद्यार्थ्यांना दिलेले प्रशिक्षण व त्याचा अध्ययन- अध्यापनात झालेला परिणाम सांगण्यात आला. तसेच आय. आय. टी., मुंबईने दिलेल्या आकाश टॅबची वैशिष्टे व प्रात्याक्षिके शिबिरात करून दाखविण्यात आली. सहविचार मंचाच्या या आठ शाळांवर जवळजवळ ४०० शिक्षकांमध्ये टॅबसंबंधी जागृती करण्यात आली. या आठ केंद्राची फोटोसह माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.



**न्यू इंग्लिश स्कूल, वेलदूर येथे आकाश टॅबची माहिती देताना सौ. अश्विनी काळे**



**नूतन माध्यमिक विद्यालय, दुगवे शिरवली, पोस्ट मिरवण येथे आकाश टॅबची माहिती देताना सौ. अपूर्वा जोशी**



**न्यू इंग्लिश स्कूल, करंबवणे येथे आकाश टॅबची माहिती देताना श्री. कैलाश कर्नेकर**



**सरस्वती विद्यामंदिर, जामसुत येथील सहविचार मंचात सहभागी झालेले शिक्षक**



**श्री. पांडुरंग रुपजी फटकरे माध्यमिक विद्यालय, शीर येथे आकाश टॅबची माहिती देताना महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई**



**न्यू इंग्लिश स्कूल, तळ सर मुंढे येथील सहविचार मंचात सहभागी झालेले शिक्षक**



**न्यू इंग्लिश स्कूल, वीर येथील सहविचार मंचात सहभागी झालेले शिक्षक**



**एल. एम. बांदल हायस्कूल, चिपळूण येथील सहविचार मंचात सहभागी झालेले शिक्षक**

केवळ जागृती करून आकाश टॅबचा शिक्षणात वापर वाढणार नाही. तर आकाश टॅबची सर्व वैशिष्ट्ये शिक्षकांनी प्रत्यक्ष हाताळून पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. ८ ते ९ जानेवारी २०१५ रोजी ''आकाश टॅब''चा शिक्षणात वापर, ही दोन दिवसाची कार्यशाळा भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय. टी.), मुंबई व महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली होणार आहे. या कार्यशाळेत खालील विषयांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आकाश-२ ची ओळख, आकाश-चा मुलभूत वापर आकाश-२ कशाप्रकारे हाताळायचा, आकाश-२ चालू करणे,बंद करणे,लॉक करणे, अनलॉक करणे, पिंच इन/आउट, इ.

- वर्ड, एक्सेल, पॉवर पॉइंट शिकण्याकरता आकाश-२ वर king soft office चा वापर
- आकाश- २ वर Wi-Fi connection - द्वारे इंटरनेटचा वापर
- आकाश२ - Wi-Fi connection द्वारे इंटरनेटचा वापर करून इ-संकेतस्थळे उघडणे, E-mail account बनवणे, YouTube, Wikipedia चा वापर करणे, इ.
- आकाश - २ वर मेयरी कार्डच्या साह्याने व्हिडिओ लेसन्स बनवणे, इ-पुस्तक वाचणे
- कॅमेरा,पेनड्राइव्ह, इतर उपकरणांसोबत आकाश-२ च्या जोडणीचे प्रशिक्षण
- C, C++, प्रोग्रामिंग शिकण्याकरता APL (आकाश प्रोग्रामिंग Laboratory) ॲप्लिकेशनचा वापर
- TV, PROJECTOR, इ. उपकरणांच्या आकाश-२ सोबत जोडणीकरता PTV TOOL चा वापर
- सामूहिक वर्गचाचणी घेण्याकरता ॲप्लिकेशन चा वापर

अशा प्रकारे गेल्या तीन वर्षापासून कोकणातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये संगणक व आकाश टॅबचे प्रशिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय यापुढे अधिकाधिक शाळांना संगणकीय ज्ञान देत राहील व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास हातभार लावेल.

**डॉ. कमलाकर देसाई**
संचालक
महर्षी परशुराम आभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी बेडेकर महाविद्यालय

जोशी-बेडेकर महाविद्यालयात पूर्व-परिषद-कार्यशाळा २६ नोव्हें. रोजी आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा यात सहभाग होता. वित्तीय सल्लागार सुप्रिया कुबल यांनी 'आर्थिक समता' या विषयावर PPT च्या माध्यमाने स्त्रियांनी बचत व गुंतवणूक कशी करावी याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यशाळेचे अध्यक्षपद प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी भूषविले. एकूण ४० प्राध्यापकांचा यात सहभाग होता.

स्टूडंटस् फोरम - विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ अंतर्गत जोशी-बेडेकर महाविद्यालयात Model Youth Parliament आयोजित करण्यात आली होती. यासाठी परीक्षक म्हणून विद्यापीठाचे प्रतिनिधी श्री. हर्षद भोसले व श्री. चन्द्रमोहन जोशी - प्राध्यापक, कीर्ती महाविद्यालय, दादर हे लाभले होते. त्यातून महाविद्यालयाच्या ११ विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड झाली, तसेच मुंबई विद्यापीठात महाविद्यालयाला दुसऱ्या क्रमांकाने गौरविण्यात आले. हा उपक्रम यशस्वी होण्यासठी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या समितीअंतर्गत काही कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयात मानव अधिकार आजची आव्हाने या विषयावर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस्चे क्रिमिनॉलॉजी व मानव अधिकार या विषयाचे प्राध्यापक डॉ. अरविंद तिवारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, त्यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

१० डिसेंबर २०१४ रोजी मानवी हक्क दिवसाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात 'मानवी हक्क दिवस, साजरा करण्यात आला, त्या निमित्ताने महाविद्यालयातील प्राध्यापक सच्चिदानंद सिंह यांचे Human Rights Evolution and Development या विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांच्या या विषयावरील चर्चेने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह उपस्थित होत्या.

### Generation Dialogue

महाविद्यालयाच्या Generation Dialogue या समितीअंतर्गत दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंगळवार दि. ९ डिसेंबर रोजी महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांनी खडवली येथील मातोश्री वृद्धाश्रमास भेट दिली. विद्यार्थी वृद्धांसाठी ब्लँकेट, साड्या, बिस्किट्स, वॉकर, काठी इत्यादी विविध भेटी घेऊन गेलेत. विद्यार्थ्यांनी आपसात पैसे गोळा करून काही रक्कमदेखिल वृद्धाश्रमास दिली. वृद्धांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. एक दिवस का होईना त्यांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबत विविध क्रीडांचे ही आयोजन केले. विद्यार्थ्यांनी सर्वांना भोजन वाढले. एकंदरीत ही भेट त्यांच्याकरता अविस्मरणीय ठरली.

महाविद्यालयाच्या कात्यायत सभागृहात या समितीद्वारेच प्रसिद्ध साहित्यिक श्री. दाजी पणशीकर यांचे दोन पिढ्यांतील संवाद-विसंवाद या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानास उत्तम प्रतिसाद दिला. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. समितीच्या सर्व प्राध्यापकवृंदाने दोन्ही कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

सत्याला शपथांच्या टेकूची गरज नसते.

**Talent Academy**

महाविद्यालयाच्या 'नाट्यमय' विभागातर्फे 'प्रयोगशाळा २०१४' या अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १६ नोव्हेंबर रोजी स्पर्धेची प्राथमिक फेरी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात पार पडली. एकूण १९ महाविद्यालयांचा यात सहभाग होता. त्यांपैकी सहा महाविद्यालयांनी अंतिम फेरी गाठली.

प्राथमिक फेरीसाठी स्पर्धक महाविद्यालयांना वेळेवरच एक विषय देण्यात आला, एकांकिका सादर करण्यास त्यांना चार तास देण्यात आले. एवढ्या वेळेत स्पर्धकांना एकांकिका बसवून सादरीकरण करायचे होते, परंतु स्पर्धकांनी उत्कृष्टपणे एकांकिका सादर केल्या व प्रयोगशाळा २०१४ हे नाव सार्थकि केले.

प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह ह्यांच्या उपस्थितीत १ डिसेंबर रोजी गडगरी रंगायतन येथे स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली. पुणे, रत्नागिरी, चिपळूण, मुंबई येथून महाविद्यालयांनी भरघोस प्रतिसाद दिला. MIT पुणे महाविद्यालयाच्या एकांकिकेला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

Talant Academy तर्फे Fine Art ची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा Piddilite Instustries च्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. Name plate Desigining, Glass Painting इत्यादी प्रकारच्या कला विद्यार्थ्यांना शिकविण्यात आल्या.

लोकसत्ता वर्तमानपत्राद्वारे आयोजित लोकांकिका स्पर्धेत महाविद्यालयाच्या 'मोझलेम' एकांषककेला ठाणे विभागात द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

महाराष्ट्राची मानद 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धा नुकतीच पुणे येथे पार पडली. कला व नाट्यक्षेत्रात या स्पर्धेचे नाव प्रथम घेतले. यंदा या स्पर्धेला ५० वर्षेदेखील पूर्ण झाली. महाविद्यालयाच्या 'नाट्यमय' च्या विद्यार्थ्यांनीदेखील 'पुनर्जन्म' ही एकांकिका या स्पर्धेत सादर केली होती. संपूर्ण महाराष्ट्रातून विविध एकांकिका या स्पर्धेत सादर एकांकिका या स्पर्धेत सादर करण्यात आल्या होत्या. महाविद्यसलयाला मानाचा 'पुरुषोत्तम करंडक' प्रथम क्रमांकाबद्दल प्राप्त झाला. 'पुनर्जन्म' ही एकांकिका महाराष्ट्रातून प्रथम आली.

उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट नेपथ्य, उत्कृष्ट कलाकार, उत्कृष्ट कथा अशी विविध पारितोषिकेदेखील महाविद्यालाल प्राप्त झाले. Talent Academy च्या प्रा. मृणमयी थत्ते, प्रा. शिवाजी नाईक, प्रा. नितिन पागी दिग्दर्शक अमोल भोर व नाट्यनयच्या सर्व कलाकरांच्या अथक प्रयत्नाने महाविद्यालयास भरघोस यश प्राप्त झाले.

महाराष्ट्र शासन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांच्या राज्यातील महाविद्यालयांत २६ नोव्हेंबर हा 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याबाबत दि. २१.११.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत सकाळी ८.३० वाजता संविधानाच्या प्रास्ताविकाचे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासमवेत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह यांनी सामूहिक वाचन केले. हे सामूहिक वाचन महाविद्यालयाच्या दर्शनी भागातील विद्या प्रसारक मंडळाचे दिवंगत अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या शिल्पासमोरील जागेत करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थी व शिक्षक संविधान दिनानिमित्त आयोजित प्रभातफेरीत सहभागी झाले. यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संविधानातील विविध तरतुदींसंबंधीचे फलक स्वतः तयार करुन प्रदर्शित केले होते. सदर प्रभातफेरीची सांगता संपूर्ण महाविद्यालय

परिसरास फेरी घालून त्याच ठिकाणी झाली.

या कार्यक्रमानंतर प्रभातफेरीत सामील झालेले विद्यार्थी व शिक्षकवृंद महाविद्यालयातील 'कात्यायन' सभागृहात एकत्र आले. या सभागृहात संविधान दिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांचे भारतीय संविधानावर व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यानात सौ. श्रीविद्या यांनी संविधानाची ठळक वैशिष्ट्ये, विविध तरतुदी व संविधानाचे महत्त्व इत्यादी विषयांचा ऊहापोह केला.

व्याख्यानानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी प्रश्न विचारले व त्यांस सन्माननीय वक्त्यांनी उत्तरे दिली. या व्याख्यानाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशाी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला अ. सिंह यांनी भूषविले.

## तंत्रनिकेतन

**श्रीनिवास रमानुजन गणित स्पर्धा परीक्षा २०१४-१५**

ISTE चॅप्टरद्वारे संपुर्ण देभर श्रीनिवास शमानुजन गणित स्पर्धा परीक्षा २०१४-१५ चे आयोजन १२ डिसेंबर २०१४ रोजी केले होते. ह्या स्पर्धेद्वारे देशपातळीवर गणितातील टॅलेन्ट शोधण्याचा प्रयत्न असतो.

सदरची स्पर्धा परीक्षा ही वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या ISTE चॅप्टरअंतर्गत पार पडली. ह्या परिक्षेत तीन शिक्षक आणि नऊ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

**रक्तदान शिबिर**

आय.एस.टी.ई. चॅप्टर वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन तर्फे शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०१४ रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर तंत्रनिकेतनामध्ये एच.डी.एफ.सी. बँक व प्लाझ्मा डायग्नोस्टिक लॅबोरेटरीज ब्लड बँक याच्या सहकार्याने पार पडले.

विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी या रक्तदान शिबिरात भाग घेतला. सदर शिबिर १०.०० ते ४.०० या वेळेत पार पडले.

**विद्या प्रसारक मंडळ, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन प्राचार्य' आणि प्रा. सौ. गीताली एस. इंगवले 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन शिक्षक' पुरस्काराने सन्मानित...**

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक आणि प्रा. सौ. गीताली एस. इंगवले यांना ISTE (इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन) या राष्ट्रीय संस्थेकडून अनुक्रमे देशातील 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन प्राचार्य' आणि 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दोन्ही पुरस्कार हे ISTE च्या ४४ व्या राष्ट्रीय परिषदेत २०१४ सालसाठी सन्माननीय प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले.

सदरची परिषद ही कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, त्रिवेंद्रम, केरळ येथे दि. २७ ते २९ नोव्हेंबर २०१४ रोजी झाली. केरळचे राज्यपाल व भारताचे माजी मुख्य न्यायमूर्ती श्री. पी. सतशिवम यांच्या शुभहस्ते दि. २७ नोव्हेंबर २०१४ रोजी परिषदेचे उद्घाटन झाले. पारितोषिक वितरण समारंभ डॉ. एस. शीला (प्राचार्य CET कॉलेज ) डॉ. आर. मुरुगसन (अध्यक्ष ISTE) व डॉ. एल. व्ही. मुरलीकृष्णा रेड्डी (अध्यक्ष ELECT, कोलकाता) यांच्या उपस्थितीत पार पडला.

ISTE ही राष्ट्रीय स्तरावर तांत्रिक शिक्षणाशी संबंधित महत्त्वपूर्ण संस्था आहे. ISTE च्या विविध कार्यात

HRD, AICTE, DST आणि मिनिस्ट्री ऑफ इन्फमेशन टेक्नालॉजी व राज्य सरकार इत्यादींचा सहभाग असतो. उच्च दर्जाचे इंजीनिअर्स, कुशल तंत्रज्ञ आणि विद्यार्थी घडविण्यात ह्या संस्थेचा मोठा सहभाग आहे.

प्राचार्य दि. कृ. नायक विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनमध्ये १९८५ सालपासून कार्यस्त आहेत. तत्पूर्वी कर्नाटक राज्यातील उडिपी या जिल्ह्यातील छोट्याशा खेड्यातून त्यांनी शालेय शिक्षणाचा श्रीगणेशा केला. १९७८ साली ते एस. एस. एल. सी. परीक्षा उत्तम श्रेणीत पास झाले. बारावीनंतर म्हैसूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालातून उच्च शिक्षण 'इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन' ह्या शाखेत डिस्टिंक्शन मिळवून पूर्ण केले. पुढे VJTI, मुंबई या संस्थेतून मास्टर डिग्री 'Computer Science' या शाखेत १९८९-९१ मध्ये प्रथम श्रेणीत संपादन केली व आता ते पुणे विद्यापीठात 'Optimization of Storage of hydrogen and safely issues' या महत्त्वाच्या विषयावर संशोधन करीत आहेत.

त्यांनी शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित कार्यकरीत असताना देशविदेशात शोधनिबंध सादर केलेले आहेत.

MSBTE, च्या कार्यातही त्यांचा सहभाग असतो. विविध प्रकारच्या पुरस्कारानी सन्मानित आहेत. रोटरी क्लब, ठाणे यांच्याकडून 'व्हेकेशनल एक्सलन्स' आणि राष्ट्रीय विद्या सरस्वती पुरस्कार, नवी दिल्ली हे दोन्ही पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत.

ISTE, या संस्थेने २००४ सालासाठी राजारामबापू पाटील प्रॉमिसिंग इंजिनिअरिंग टिचर नॅशनल ॲवॉर्डने सन्मानित केले होते.

तंत्रनिकेतमध्ये सुरुवातील इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्टुमेंटेशन आणि कॉम्प्युटर विषयाचे शिक्षक म्हणून ते रुजू झाले. प्रथम शिक्षक, विभागप्रमुख, उपप्राचार्य आणि २००४ सालपासून प्राचार्य आहेत. तंत्रशिक्षणाबद्दल आस्था आणि व्यवस्थापकीय कौशल्ये इत्यादी गुण त्यांच्या अंगी आहेत.

सन २०१४ सालसाठीचा ISTE रंगनाथन इंजीनिअरिंग कॉलेज, सर्वोत्तम तंत्रनिकेतन प्राचार्य या मानांकनासाठी हा राष्ट्रीय पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. त्यांना देशातील सर्वोत्तम तंत्रशिक्षणातल्या कामगिरीसाठी हा पुरस्कार देण्यात आला.



**ISTE संस्थेकडून 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन प्राचार्य ' पुरस्कार डॉ. के. पी. आयझॅक (मेंबर सेक्रेटरी AICTE, नवी दिल्ली) याजकडून स्वीकारताना वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक आणि सोबत इतर मान्यवर**

प्रा. सौ. गीताली एस. इंगवले ह्या वरिष्ठ अध्यापक (ह्युमॅनिटीज ॲप्लाइड सायन्स विभाग) म्हणून तंत्रनिकेतनात कार्यरत आहेत. विद्यार्थिप्रिय शिक्षक अशी त्यांची ख्याती आहे. ISTE स्टुडंन्ट चॅप्टर - वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या संघटन सचिव म्हणूनही त्या कार्यरत आहेत.



ASTE **संस्थेकडून, सर्वोत्तम तंत्रनिकेतन शिक्षक' (महाराष्ट्र गोवा विभागातून) पुरस्कार सी. ई. टी. कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगच्या प्राचार्य डॉ. एस. शीला याजकडून स्विकारताना प्रा. सौ. गीताली एस. इंगवले सोबत इतर मान्यवर**

त्यांनाही २०१४ सालासाठीचा 'सर्वोत्तम तंत्रनिकेतन शिक्षक' पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्र गोवा (विभागून) ह्या मानांकनासाठी मिळाला आहे. दोन्ही पुरस्कारांनी राष्ट्रीय स्तरावर विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन लौकिकास पात्र ठरले आहे. एकाच संस्थेतील दोन व्यक्तीना पुरस्कार प्राप्त झाल्याने प्राचार्य दि. कृ. नायक आणि प्रा. सौ. गीताली इंगवले यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

**वृत्तसंकलन**
**श्री. चंद्रकांत एस. शिंगाडे**
ग्रंथालय-सहाय्यक
वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन
ठाणे - ४०० ६०१

●●●

## *प्रदूषण आणि दुष्काळ*

जेव्हा झाली प्रगती मानवाची
तेव्हा वाढली रेलचेल यंत्रांची
वाढ झाली इथे कारखान्यांची
निर्मिती झाली जगात शहरांची ॥१॥

शहरांत झाली गर्दी खेडुतांची
बजबजपुरी झाली सर्व शहरांची
कारखान्यांना गरज भासली इंधनाची
गरजपूर्तीसाठी केली झाडतोडी ॥२॥

नष्ट झाली शोभा जगात निसर्गाची
झाली मरुभूमी या नंदनवनाची
डोंगर उजाड, नांदी ही वाळवंटाची
झाली वाढ भयंकर तापमानाची ॥३॥

झाली घट अतिशय पर्जन्यमानाची
पातळी वाढली धूर, धूळ, प्रदूषणाची
खेडेगावात शेतीला टंचाई पाण्याची
शेतकऱ्याला लागली झळ दुष्काळाची ॥४॥

विजेची टंचाई, सक्ती भारनियमनाची
तज्ज्ञांची ओरड, झाली हानी निसर्गाची
वेळ आली आता रोपे लावण्याची
झाडे वाढविण्याची, पर्यावरण जपण्याची ॥६॥

**लेखक / कवी - सुरेश पित्रे**
''वैद्य सदन'', पहिला मजला, राघोबा शंकर
रोड,चेंदणी, ठाणे (प.) - ४०० ६०१
भ्रमणध्वनी - ९००४२३०४०९

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय)**

झाले. 'पात्रता' आणि 'विद्वत्ता' यापेक्षा राजकीय सोय बघूनच अनेकवेळा या संस्थावर सभासदांची नेमणूक व्हायला लागली. याचा व्हायचा तोच परिणाम आज झालेला दिसतो. भाषेच्या नावाने राजकारण करून अनेक नवीन पक्ष जन्माला आले. मुंबई-ठाण्याकडे त्यांची सत्ताही स्थापन झाली. मुंबई-ठाण्याकडील मराठी ग्रंथालयांची आजची दुर्दशा यांच्याच काळातली आहे. एखाद्या पक्षाला आपला जाहीरनामा 'विकास आराखडा' हा मराठी शब्द सोडून 'ब्लू प्रिंट' म्हणून सादर करावा लागतो, याच्याइतका दांभिकपणा दुसरा शोधून सापडणार नाही.


मराठी किंवा हिंदी भाषा उच्चारानुरूप लिहिल्या जातात. जगातील फार कमी भाषांमध्ये ही शास्त्रोक्त पद्धत आढळून येते. ऱ्हस्व, दीर्घ आणि अनुस्वारांच्या माध्यमांतून या भाषेला प्रमाणित करण्यात येते. पुन्हा एकदा जातीय द्वेष आणि भाषेच्या सुलभीकरणाच्या नावाखाली आपण मराठी भाषेच्या शुद्धलेखनाचे तीन-तेरा वाजविले. कथा, कादंबऱ्यांकरता नसली तरी विज्ञानाच्या लिखाणाकरता प्रमाणभाषेचीच आवश्यकता असते. मराठी ज्या मुशीतून जन्माला आली त्या संस्कृत भाषेचा याकरता आधार घेणे हे नैसर्गिकच आहे. पण ती ब्राह्मणांची भाषा! इंग्रजीची बेसुमार उसनवारी करायला मात्र 'अस्मिता' कोठेच आड येत नाही!! भाषा ही संस्कृतीचे वहन करते, आणि शब्द जर का सांस्कृतिक अर्थ व्यक्त करू शकले नाहीत किंवा जपू शकले नाहीत, तर उसनवारीने घेतलेले शब्द भाषा समृद्ध करण्याऐवजी विकृतच करतात. विज्ञानाची इतकी प्रचंड घोडदौड चालू आहे की, त्याकरता परिभाषा निर्माण करणे अपरिहार्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीत तसा पहिला प्रयत्न केलेला दिसतो. शिवकालीन मराठीवर फारसीचे प्राबल्य होते. शिवाजी महाराजांनी त्याकरता आपले अमात्य रघुनाथपंत हणमंते यांच्याकडून सुमारे १६७६/७७ च्या सुमारास 'राज्यव्यवहार कोश' लिहून घेतला.

इंग्रजी भाषेच्या उसनवारीने आपण भाषा समृद्ध करणार असू, तर ते विज्ञानग्रंथ मूळ इंग्रजीतच वाचायला काय हरकत आहे? मराठी शाळांच्या आजच्या दुर्दशेला हीच मानसिकता आणि सरकारची अनाकलनीय धोरणे जबाबदार आहेत. पालकांना आज आपल्या मुलांना इंग्रजी भाषेच्या शाळांमध्ये घालायचे आहे; ते ती भाषा श्रेष्ठ आहे म्हणून नाही, तर जागतिक व्यवहार आज त्या भाषेमध्ये चालतो म्हणून. इंग्रजीच्या कुबड्या घेऊन मराठी शिकण्यापेक्षा सरळ इंग्रजी माध्यमाचा स्वीकार पालक म्हणूनच करतात. विनाअनुदानित इंग्रजी शाळा चांगले शिक्षक नेमू शकतात. मराठी शाळांच्या अधःपतनाचे एक प्रमुख कारण म्हणजे तेथील अनेक शिक्षकांचा सुमार दर्जा. पण हे सांगण्याची आज सोय नाही.

एकोणिसाव्या शतकात मराठीमध्ये जेवढे विज्ञानलेखन करण्याचा प्रयत्न झाला तेवढाही आज नवीन विज्ञान मराठीत आणण्याकरता होताना दिसत नाही. मराठी भाषेच्या इतिहासाच्या लेखनामध्येही कथा, कादंबऱ्या, आणि कविता यांच्या इतिहासालाच प्राधान्य असते. १९८१ साली भारत इतिहास संशोधन मंडळाने मराठीतील 'आर्थिक' आणि 'सामाजिक' लिखाणाच्या इतिहासाचा मागोवा घेणारी सुमारे सव्वाशे पानांची पुस्तिका प्रकाशित केली आहे. यामध्ये कमीतकमी या विषयाच्या मराठीतील लेखनाची तरी भरपूर माहिती मिळते, पण हे पुस्तक मात्र इंग्रजीमध्ये आहे. श्री. व्ही. डी. दिवेकर हे त्या पुस्तकाचे लेखक आहेत. एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील विज्ञानाचे बहुतेक लिखाण हे जरी भाषांतरित असले तरी स्वतंत्रपणे काही पुस्तके लिहिण्याचाही प्रयत्न झालेला दिसतो.

विल्किनसन हे एक धर्मप्रसारक होते. भारतीय

ज्योतिषांचा पुराणग्रंथांवरील विश्वास त्यांना खटकत होता. अर्थातच अशा पुराणग्रंथांना नावे ठेवून या ज्योतिष्यांमध्ये धर्मप्रसार करता येणार नाही हेही त्यांच्या लक्षात आले.


सिद्धांतशिरोमणिप्रकाश

मालवदेशीय शिहोर नगरस्थ

सुबाजी बापु

याणीं केला.

शके १७५७ मन्मथनामसंवत्सरे

**सुबाजी बापू यांचे 'सिद्धान्तशिरोमणिप्रकाश'**

सुदैवाने 'सूर्यसिद्धान्त' आणि १२ व्या शतकातील भास्कराचार्यांचे लेखन त्यांच्या वाचनात आले. तत्कालीन आधुनिक विज्ञानापेक्षाही प्रगत विचार त्यात मांडलेला बघून ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी चक्क सुबाजी बापू या मराठी पंडिताची मदत घेऊन त्या ग्रंथांचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. सुबाजी बापू यांनी पुढे जाऊन १८३५ मध्ये 'सिद्धान्तशिरोमणिप्रकाश' हा कोपर्निकस, भास्कराचार्य आणि पुराणातील माहितीवर आधारित एक तौलनिक ग्रंथ मराठीत लिहिला. डॉ. कॅरे यांनी १८०५ साली प्रकाशित केलेले मराठीचे व्याकरण आपल्याला माहिती आहे. पण १८२७ च्या सुमाराला मद्रासमध्ये व्यंकटमाधव या मराठी पंडितांनी 'महाराष्ट्रप्रयोग चंद्रिका' हे मराठी व्याकरण संस्कृतमधून लिहिले, आणि मराठीतून त्याचे स्पष्टीकरण दिले. श्री. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी मोठ्या कष्टाने ते मिळवून १९७० साली पुण्याहून प्रकाशित केले. दुर्दैवाने मराठीतील विज्ञानलेखनाची विस्तृत माहिती लिहिण्याचा फारसा प्रयत्नच झालेला नाही. मराठीमध्ये झालेले आधीचे विज्ञानलेखन म्हणूनच आपल्याला माहीत नाही. पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरातील रघुनाथ या पंडितांनी लिहिलेला 'भोजनकुतूहल' हा सतराव्या शतकातील आहारशास्त्रावरील ग्रंथ आणि एका अनामिक लेखकाने लिहिलेला 'गंधवाद' हा सुगंधी द्रव्यावरील १५ व्या शतकातील ग्रंथ यांचा फारसा उल्लेखही मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये होत नाही. ते अनुक्रमे केरळ आणि बडोदा येथून छापले गेले.

मराठी भाषेला 'अभिजात' 'भाषेचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासन सध्याचे सांस्कृतिक आणि शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी दिले आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी मराठी भाषेचा मुळारंभ इ.स.४८८ सांगितला असला तरी त्यासाठी कुठलेही ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. डॉ. प. ल. वैद्य, श्री. बा. अ. भिडे, डॉ. अ. न. देशपांडे किंवा य. रा. दाते या संशोधकांनाही मराठीचा आरंभकाळ १०/११ व्या शतकापूर्वी नेण्याकरता हवे असलेले पुरावे देता येत नाहीत. शिलालेख आणि इतर साधनांच्या आधारे, डॉ. तुळपुळे मराठीचा आरंभकाळ इ.स.१०१२ पर्यंत नेता येण्याची शक्यता व्यक्त करतात. मराठीला १५०० किंवा २००० वर्षे जुनी म्हणणे हे शास्त्रीय कसोट्यांवर टिकणारे नाही. अस्मिता आणि भावनांचे राजकारण, बास्कळ चर्चांचे विषय होऊ शकतील, पण यामुळे मराठी तसूभरही पुढे सरकणार नाही. मराठीला अभिजात दर्जा जरी मिळाला तरी मराठी शाळांच्या आजच्या शोचनीय परिस्थितीमध्ये काडीचाही फरक पडणार नाही. भाषाशास्त्र किंवा मराठी भाषाप्रेमींनी 'यादवकालीन मराठी भाषा' या शं. गो. तुळपुळे यांच्या पुस्तकातील एस. एम. कत्रे यांची इंग्रजीतील प्रस्तावना (१९४२), प्रा. सुहासिनी लद्दू यांचे १९८३ साली प्रकाशित झालेले 'मराठीच्या प्रमाण भाषेचे स्वरूप' आणि १९२८ साली प्रकाशित झालेल्या 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश याच्या पहिल्या खंडातील वसंत

जीवन हा एक पाण्याचा प्रवाह आहे, समुद्र गाठायचा असेल, तर खाचखळगे पार करावेच लागतील.

आबाजी डहाके यांची विस्तृत प्रस्तावना (आमुख)अवश्य वाचावी. मराठी टिकण्याकरता मराठ्यांनी व्यापारी व्हायला हवे असा आणखीन एक जावईशोध मंत्री महाशयांनी लावला. सबंध भारतभर बहुसंख्य व्यापारी गुजराती किंवा मारवाडीच आहेत, पण गुजराती भाषेची आजची परिस्थिती ही मराठीसारखीच आहे. चिनी बनावटीचा माल आज जगभर विकला जात आहे, तरीही चीनमध्ये इंग्रजी शिक्षणाचाच प्रभाव वाढता आहे.

नुकत्याच महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धा झाल्या. अनेक मराठी एकांकिकांची शीर्षके मात्र इंग्रजीमधून होती. दूरदर्शन आणि वृत्तपत्रे यांतूनही सरावाचे मराठी शब्द टाळून इंग्रजी शब्दांचा वापर सर्रास चालू आहे. 'विश्रांती' हा साधा सोपा आणि नेहमीच्या सरावातील मराठी शब्द असूनही हट्टावाने 'ब्रेक' चा वापर मधल्या विश्रांतीकरता आपण आहोत. मंत्रालय, महापालिका ते जिल्हापरिषद येथून प्रसृत होणारी परिपत्रके ही एवढ्या भयानक मराठीत असतात की तो एक वेगळ्या संशोधनाचा विषय ठरेल. दुर्मीळ मराठी पुस्तकांचे संवर्धन, संगणकीकरण हे मराठीच्या विकासाकरता आवश्यक आहे. पण घोषणाबाजीपलीकडे सरकारचे पाऊल पुढे पडताना दिसत नाही.आठशे मराठी हस्तलिखितांचा खजिना ब्रिटिश ग्रंथालयाने आपल्या संकेतस्थळावर नुकताच टाकला आहे. अभ्यासाकरता मानव्य आणि विज्ञानाच्या बहुतेक सर्व जुन्या आणि नवीन इंग्रजी संशोधनपत्रिका या आज संगणकावर उपलब्ध आहेत. १९-२० व्या शतकातील मराठीतून निघणारी मासिके, नियतकालिके आज संशोधनाकरतासुद्धा बघणे कठीण झाले आहे. प्रभाकर (१८४५), ज्ञानसिंधू (१८४१), मित्रोदय (१८४४), ज्ञानप्रकाश (१८४८), ज्ञानेदय (१८४२), विचार लहरी (१८५२), वर्तमानदीपिका इ. नियतकालिके आणि दिग्दर्शन (१८४०) ज्ञानचंद्रोदय (१८४०), उपदेशचंद्रिका (१८४४), मराठी ज्ञानप्रसारक (१८५०), ज्ञानदर्शन (१८५४), पूणे पाठशाळा पत्रक (१८६१), विविध ज्ञानविस्तार (१८६७) आणि दंभहारक (१८७१) इ. मासिकांतून तत्कालीन समाजविचारांची माहिती ठासून भरली आहे. ती सर्व आज संगणकावर उपलब्ध होणे आवश्यक आहे.

मातृभाषेतून शिक्षणाकरता दर्जेदार मराठी साहित्य निर्मिती १९६९ साली 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'ची स्थापना झाली. दुर्दैवाने आज त्या मंडळातून फारसे काही प्रकाशित होतांना दिसत नाही. मराठीच्या विकासाकरता स्वतंत्र विद्यापीठाच्या निर्मितीचा खटाटोप चालू आहे. यामुळे बऱ्याच जणांना नवीन रोजगार मिळेल यात शंका नाही. आज मराठीच्या विकासाला खरी गरज आहे ती या विषयाला राजकारणापासून आणि विद्वानांच्या 'बोली' भाषेच्या प्रेमापासून मुक्त करण्याची. बोली भाषेचे एक महामंडळ काढून तेथे या सर्व विद्वानांची सोय करावी. अट एकच असावी, ती म्हणजे त्यांनी त्यांचे सर्व लिखाण आणि भाषणे बोली भाषेतच करावीत. बोली भाषांच्या अभ्यास अवश्य हवा, पण त्याकरता प्रमाण भाषेला त्याच्या विरुद्ध उभे करण्याची काहीच आवश्यकता नाही. दोघांचीही क्षेत्र आणि उपयोग वेगळे आहेत. शुक्रवार, १९ डिसेंबरच्या महाराष्ट्र टाईम्स पृष्ठ ९ वर बोली भाषेचे अभ्यासक श्री. देवी यांची मुलाखतही अशीच भावनीक आणि अतिरंजीत विधानांनी भरलेली आहे. गौतम बुद्धांना ६० भाषा अवगत होत्या हे असेच त्यांनी केलेले सुमार विधान. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना कुठल्या 'भाषेत' संबोधले याची कुठलीही माहिती आज आपल्या जवळ नाही. सुरुवातीचे अनेक बौद्ध ग्रंथ पाली भाषेत लिहिले गेले. जैनांचे लिखाण अर्धमागधी भाषेत झाले. दोन्ही धर्मांच्या विद्वानांना या भाषा सोडून शेवटी संस्कृतमध्येच लिखाण का करायला लागले या प्रश्नाचे उत्तर शोधायचा प्रयत्न केला, तर मराठी टिकवण्याकरता तिला सशक्त प्रमाण भाषा करणे का जरुरीचे आहे याचे उत्तर त्यांना मिळेल. अभ्यासकांनी पाली आणि प्राकृत भाषेकरता श्री. ग. वा. तगारे यांचे १९८०

साली प्रकाशित झालेले 'पाली साहित्याचा इतिहास' आणि १९८७ साली प्रकाशित झालेले 'प्राकृत साहित्याचा इतिहास' ही पुस्तके अवश्य वाचावीत. श्री. देवी यांच्या माहितीवरूनच हे सिद्ध होते की बोली भाषा कधीही फार काळ टिकू शकत नाहीत. त्यामध्ये नविन ज्ञान ग्रहण आणि प्रसार करण्याची क्षमता नसते. 'प्रमाण' भाषेची शक्ती ही ती भाषा किती लोक बोलतात यावर अवलंबून नसून, कथा कादंबऱ्यांप्रमाणेच विज्ञान आणि तत्वज्ञानाचे अनुभव व्यक्त करण्याचे शब्द सामर्थ, हीच तिची खरी ताकद असते.

पूर्वी संस्कृत आणि सध्या इंग्रजीतून शिकणे लोक का पसंत करतात हे म्हणूनच समजून घेणे आवश्यक आहे. १५ व्या-१६व्या शतकातल्या कोपर्निकस (१४७३-१५४३) गॅलिलीओ (१५६४-१६४२) आणि न्यूटन (१६४३-१७२७) या सगळ्या महत्वाच्या पाश्चात्य संशोधकांनी लॅटिनमध्ये लिखाण केले तर त्यांचे भारतातील समकालीन केरळातील गणितज्ज्ञानी आपले ग्रंथ संस्कृतमधून लिहले आहेत. आजही वैद्यकशास्त्रातील इंग्रजी पुस्तकातून बहुतेक मुळ शब्द लॅटिन किंवा ग्रीक मध्येच आहेत. त्यांना काढून टाकण्याचा प्रयत्न कधीच झालेला दिसत नाही उलट आजही संगणक, अभियांत्रीकी किंवा वैद्यकशास्त्रात लॅटिन शब्द घेतले जातात. इंग्रजी शिकताना हे लॅटिन किंवा ग्रीक शब्द कठीण आहेत ही तक्रार कधी ऐकू येत नाही. वनस्पती आणि प्राणिशास्त्रातील उच्चारताही न येणारे लॅटिन शब्द आपण मुकाटपणे पाठ करतो, पण द्वेष आणि मत्सराची कावीळ झालेल्या अनेक भाषाविद्वानांना मराठीसाठी विज्ञानाची परिभाषा करताना संस्कृतची मदत घेणे मागासलेपणाचे वाटते. पण दर १२ कोसावर बदलणाऱ्या बोलीभाषांमधले शब्द घेण्याची सूचना मात्र त्यांना करावीशी वाटते. विज्ञानामध्ये शब्दांच्या अचूकपणाला असलेले महत्व बहुतेक यांच्या गावीही नाही.


मराठीला इंग्रजीच्या प्रभावातून एक वेळ वाचवता येऊ शकेल, पण साहित्य संमेलनाचे आजी-माजी अध्यक्ष, राजकारणी आणि भाषावैज्ञानिकांपासून तिचे रक्षण करणे आज तरी शक्य दिसत नाही.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●



**नाना फडणीस यांनी मुद्रित केलेल्या भगवद्‌गीतेसाठी तयार केलेली ताम्रमुद्रा**




**मुंबईत छापलेल्या पहिल्या उपलब्ध पुस्तकाचे शीर्षकपृष्ठ -१८१८**

---

# V.P.M.'s Polytechnic, Thane

# Information Technology Centre

'Jnanadweepa', Bldg. No.1, College Campus, Chendani Bunder Road, Thane (W) 400601.

**Tel : 25339866, Mob : 9619651156 Email : vpm_itcentre@vpmthane.org**

## POST GRADUATE ADVANCE DIPLOMA PROGRAMMES

Government Recognized Courses Affiliated to MSBTE, Mumbai For Graduates and Working Professionals

### ❖ Advance Diploma in Computer Software System Analysis and Applications (CP)

**Eligibility** - Any Diploma in Engineering or Technology / Any Degree
**Duration** - One Year - Part Time - Semester Pattern

### ❖ Advance Diploma in Industrial Safety (IT)

**Eligibility** - Any Science Graduate / Graduate in Medical Science / BDS / OT.PT / Graduate in Veterinary Science or its Equivalent from a recognized Statutory University / Board or Degree / Diploma in Engineering / Technology with Two years' experience in Manufacturing Maintenance or Safety Department of a factory or Two years' experience in enforcement of Legislation pertaining to Safety.
**Duration** - One Year - Full Time - Annual Pattern

### ❖ Advance Diploma in Energy Management and Audit (ER)

**Eligibility** - 1) Any Diploma / Degree in Engineering / Technology from a recognized statutory Board / University or its equivalent or
2) Science graduate from recognized University with 1 year relevant experience
**Duration** - One & Half Year - Part Time - Semester Pattern

## YCMOU Recognized MKCL's WAVE Certified Computer Courses

- Photo Editor
- Content Illustrator
- Desktop Publisher
- 2D Animator
- Graphic Designer
- Stationery Designer
- Web Designer
- Video Editor
- AutoCAD Draftsmen
- IT Hardware Support Technician
- Office Assistant
- Tour Planner
- Excel expert
- Presentation Specialist
- Marketing Executive
- Tally Expert
- C Programmer
- C++ Programmer

**MS-CIT**
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स !

MKCL

## Mastering JEE

ENSURE EXCELLENT SCORES IN JEE
For FYJC & SYJC Science students!

MKCL
Creating a Knowledge Lit World

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.